# [illegible]

हें पुस्तक

## त्रिंबक अप्पाजी भोंजाळे

ऊर्फ तात्याबा पुणेंकर यांनीं तयार करून,

सर्व हक्कासुद्धां

## रंगो रामचंद्र सोळंकर

यांस दिलें असे तें त्यांणीं

पुणें, पेठ बुधवार, येथें "अंबाप्रसाद"
छापखान्यांत छापिलें.

सन १८८८ इसवी.

आवृत्ति १ ली.

या पुस्तकासंबंधी सर्व हक्क प्रसिद्धकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत, आणि सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें रजिस्टर केले आहेत.

किंमत १२ आणे.

ग्रंथसंग्रहालय
दा.क्र. 14732
वाई जि.

Shrinivas Ramchandra

# प्रस्तावना.

पूर्वींपासून चालत आलेल्या ज्या रीतिभाती त्या हल्लींच्या दिवसाला फार दूषणीय झाल्या आहेत, याचें कारण विद्यावृद्धि विशेष झाली त्यामुळें सर्वत्रांस मीपणाची गोडी लागली. आपल्या पूर्वजांनीं कोणतीं सत्कृत्यें केलीं इकडे मुळींच लक्ष नसून उलट पातकाचा प्रचार वाढत चालला. विद्या फार जरी केली तरी तो गुणवान असें ह्मणतां येत नाहीं. कारण शिकलेल्या विषयाचें स्पष्टीकरण जर त्याच्या मनांत भरलें नाहीं, तर तो विषय त्याचे हातून महात्वाचा होणार नाहीं. उदाहरण, जर आपण एखादें गांव पाहिलें नाहीं आणि त्या गांवाचें यथातथ्य वर्णन मुखोद्गत केलें ह्मणून ज्यानें तो गांव पाहिला असेल त्याची तो बरोबरी करूं शकणार नाहीं. तशी सर्वांशीं हल्लीं स्थिति झाली आहे.

एका सूत्रामध्यें नानारंगांचीं गुंफलेलीं फुलें जशीं शोभा देतात तशीं सूत्र काढून घेतल्यावर विखुरलीं असतां शोभा देत नाहींत. तसें कलीचा प्रादुर्भाव झाल्यापासून सत्य नाहींसें होऊन असत्याचा प्रचार फार झाला. धर्माचा ऱ्हास होत चालला. षड्रिपु बलवान झाले. देवादिकांच्या पूजनाचा कंटाळा येऊं लागला. मातापितरांची निर्भत्सना होऊं लागली.

अबलांचें प्राबल्य झालें. तपश्चर्येचा लोप झाला. असे अनेक प्रकार होऊन सर्वस्वी जगरहाटी क्षीणतेस आली.

असो, वरील विषय लिहिण्याचा मुख्य उद्देश इतकाच कीं, पुढें लिहिलेल्या नाटकांतील पात्रें सत्यासत्यतेचा विचार कितपत करतात हें स्पष्ट दर्शविलें आहे. शिवाय होणारे परिणामही सहज लक्ष्यांत यावेत आणि त्यापासून सर्वत्रांनीं पराङ्मुख व्हावें ह्मणून हें नाटक लिहिलें आहे.

या नाटकांत स्त्रिया ह्या पुरुषांस कशी मोहनी घालतात व प्रसंगीं कसें वर्तन करतात याचें यथातथ्य वर्णन केलें आहे, तरी सर्वत्र वाचकजनांस माझी विनयपूर्वक प्रार्थना आहे कीं, माझ्या अल्पमतीनें रचलेल्या या नाटकास मान देऊन स्त्रियांच्या चापल्यवृत्तीचा विळक्षण मासला हृदयांत ठेवतील ही आशा आहे.

तात्याबा पुणेकर

पुस्तककर्ता.

☞ Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit. in memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.

# रमा नाटक.

स्थळ सोलापुर शहर.

कृष्णाजीपंताचा बसण्याचा दिवाणखाना.

कृष्णाजीपंत व बळवंतराव.

**कृष्णाजीपंत**—(मनाशीं) काय करावें? उद्योगाकडे बिलकुल लक्ष लागत नाहीं. आणि तो जर न करावा तर घरांत फार जाच होतो. बरें, घर सोडून परदेशीं जावें तर तिकडे फार दिवस राहिल्यानें कंटाळा येऊन परत घरीं केव्हां जाईन असें होतें. येथेंच नोकरी करून राहवें तर ताबेदारी होण्याची मारामार. त्यांतून आतांच्या सावकारी नोकऱ्या ह्मणजे शुद्ध हमालीप्रमाणें आहेत. सदोदित मालकाची हांजीहांजी करावी लागते आणि कदाचित् तीही पत्करली असती, परंतु पगार थोडा त्यामुळें अगदीं लक्ष लागत नाहीं. सरकारी नोकरीविषयीं तर नांवच काढायला नको. कारण, हल्लीं इंग्रेजी शिकलेल्यांनामुद्धां वशिला लागतो, मग आपल्याला तर इंग्रेजीचा अभाव. (स्तब्ध राहतो) कांहीं विचार सुचत नाहीं. अक्कल अगदीं गुंगून गेली. परवां बळवंतरावसुद्धां रागें भरला, पण करूं काय कांहींच उपाय चालत नाहीं. (विचार करून) हो, बरी

आठवण झाली. गोविंदरावानीं एकदां मला सांगितलें होतें कीं एका सावकाराला कारकुन ठेवायचा आहे. तर त्यालाच सांगावें कीं जमत असल्यास मी राहतों. मात्र पगाराबद्दल ठराव आधीं केला पाहिजे. थोडा पगार मिळत असला तर काय उपयोग निदान पंधराच्यावर मिळाला पाहिजें. (अशा विचारांत आहे इतक्यांत **बळवंतराव** येतो ) या **बळवंतराव**.

बळ०—बसा बसा तुम्ही. उठता कशाला ?

कृष्णा०—या या असे गादीशी बसा. (असें बोलून त्यास गादीशीं टेंकून बसवितो. )

बळ०—कां काय चाललें आहे ?

कृष्णा०—कांहीं नाहीं. आतां बाहेरून फिरून आलों आणि सहज बसलों होतों.

बळ०—फारसे विचारांत निमग्न होतां ?

कृष्णा०—विचार कसला करायचा !

बळ०—बरें तें असो. मी आज कांहीं विचारणार आहें.

कृष्णा०—काय विचारणार ते विचार.

बळ०—तुला राग तर येणार नाहीं ना? नाहीं तर विनाकारण स्नेहांत अंतर नको.

कृष्णा०—तें कांहीं नाहीं, यांत राग कसला? एकमेकांनीं एकमेकांस बऱ्यावाईट गोष्टी समजविल्या पाहिजेत. नाहीं तर मग स्नेहधर्म काय !

बळ०—अरे, आतांशीं तूं नोकरी करित नाहींस, किंवा उद्योग करित नाहींस. दोन वेळां जेवून स्वस्थ फि-

रतोस. तुला ह्मणावें काय ! अशानें परिणाम लागेल कां? घरीं जरी बोलत नाहींत तरी आपण विचार केला पाहिजेना ? परवां तुझे दादा आणि मी बाजारांत गेलों तेंव्हां तुझ्याबद्दल त्यांना दोघां तिघांनीं फार दूषण दिलें त्यामुळें दादांना फार वाईट वाटलें पण करणार काय ! तुझ्या पुढें कांहीं उपायच नाहीं. आह्मी जरा ज्यास्त बोलावें तर तीही पंचाईत. तूं विचार कर. अरे बाबा सर्व करावें, परंतु कोणाच्या दूषणाला अधिकारी होऊं नये. आपला उद्योग करून पाहिजे तें केलें तरी कोणी नांवें ठेवीत नाहींत.

**कृष्णा०**—तूं ह्मणतोस तें मी समजत नाहीं कां, परंतु मी तरी काय करूं !

**लव०**—अरे करायचें काय ! प्रयत्न केल्यावर काय होणार नाहीं !

**कृष्णा०**—तें सर्व खरें परंतु आतां तूंच सांग. काम करूं तें. आजपासून तुझ्या सांगण्याबाहेर मी कधीं वागणार नाहीं.

**लव०**—असा जर नियमानें चालशील तर सर्वांना आनंद होईल. तुझ्या अंगीं गुण नाहीं कां? परंतु त्या सर्वांची तुं आपल्या हातानें माती करून टाकलीस. तुझ्या दादाला या गुणामुळें किती आनंद वाटतो. आणि ते अक्षई ह्मणत असतात कीं आमच्या कृष्णाची बरोबरी करणार कोणी नाहीं. परंतु या स्वच्छंदपणानें त्यावर त्यानें पाणी घातलें. मला त्यांनीं कितिक वेळां सांगितलें कीं तुझा त्याचा स्नेह

आहे तर चार गोष्टी सांगून त्याला मार्गाला लाव; परंतु मी काय करूं, माझ्याही मनांत फार आहे कीं जर तूं माझ्या ह्मणण्याप्रमाणें चाललास तर फार चांगलें होईल.

कृष्णा०—मित्रा आतां मी माझ्या मनाचा दृढ निश्चय केला आहे कीं मी तुझ्या मतानें चालेन, परंतु माझें एक मागणें आहे.

बळ०—काय तुझ्या मनांत असेल तें मला सांग. योग्य असल्यास मी फार खुषीनें कबूल करीन.

कृष्णा०—दुसरें कांहीं नाहीं. मला गाण्यावाजविण्याचा छंद आहे; याकरितां स्वतंत्र एक जागा बसण्याला घेऊन रात्रीं दोन तास तेथें आनंदांत घालवावे.

बळ०—अरे, उद्योग करूं लागलास म्हणजे अशा कामाला कोणी नांव ठेवणार नाहीं. परंतु आपण बेतानें वागावें हें चांगलें.

कृष्णा०—ह्याविषयीं काळजी नको. आतां तूंच मला एखादी नौकरी लावून दे म्हणजे दिवसभर नौकरी करून रात्रीं जेवण झाल्यावर दोन तास बसत जाईन.

बळ०—ठीक आहे. मला परवां एकानें सांगितलें आहे कीं, सदरबाजारांत लक्ष्मणराव म्हणून कोणी मराठा कंत्राटदार आहे त्याला गुजराथी लिहिणारा कारकून पाहिजे. कारण, त्याचा भागीदार गुजराथी आहे; तेव्हां जमाखर्च सर्व त्या भाषेंत ठेव-

ला पाहिजे; तर तुला गुजराथी येतच आहे आणि ती नौकरी तुझ्या योग्य आहे.

**कृष्णा०**—बरें तर मी कबूल आहें. परंतु पगार काय देणार ?

**बळ०**—अरे पगार वाढवून घेणें आपल्याकडे आहे, तरी तो वीस रुपयेपर्यंत पगार देईल असें वाटतें.

**कृष्णा०**—ठीक आहे; मग केव्हां ही तजवीज करणार?

**बळ०**—मी त्याला आज जाऊन भेटतों व नक्की करतों. उद्यांपासून तुला नेऊन रुजू करतों. म्हणजे झालें ना ?

**कृष्णा०**—आधीं ही गोष्ट दादांना कळवूं नको.

**बळ०**—कां बरें ? दादा काय करणार ?

**कृष्णा०**—तसें नव्हे, मी रुजू झाल्यावर कळली म्हणजे ते म्हणतील कीं आतां काळजी करूं लागला.

**बळ०**—शाबास ! इतकाच मनांत आनंद ना ? बरें तुझ्यासारखे कां होईना. आतां मी जातों.

**कृष्णा०**—बरें तर. ( बळवंतराव निघून जातो; कृष्णराव मनाशींच ) मित्र असावा तर असाच ! किती माझ्याविषयीं त्याला वाईट वांटतें आहे ! तर आतां आपण त्याच्या म्हणण्याप्रमाणेंच वागलें पाहिजे. ( खिशांतून घड्याळ काढून पाहतो ) अरे बराच वेळ झाला. घरीं आईनें आपल्यालीं लौकर बोलाविलें आहे. ( असें बोलून निघून जातो. )

# प्रवेश २ रा.

स्थळ—सोलापुर शहरांतील कृष्णरावाच्या दिवाणखान्याशेजारील खोली.

रमा—सकु—( रमेची आई. )

रमा—( मनाशीं ) काय बाई करावं ! मनाला कोणतेही प्रकारानं सुख लागत नाहीं. संसारामध्ये आनंद काय तो पतीपासून, आणि तेच जर मनायोग्य नसेल तर जन्मभरपर्यंत दुःखावांचून साधनच नाहीं. पुष्कळ पैसा असो अथवा मुळींच नसो, खाण्यापिण्याचं सुख असो किंवा नसो. सासुसासरे वगैरे वडील माणसं असोत नसोत. घरदार असो नसो. परंतु एक मनायोग्य पतीवांचून सर्व व्यर्थ आहे. ईश्वरानं मला रूप दिलं खरं परंतु याच्या योग्य जर पति सुख असतं तर माझ्यासारखी भाग्यवान कोणीच नसती. आईबापांनीं लहानपणीं लग्न करून या करंट्याच्या पदरीं मला बांधली. नाहीं सत्तेचं घर किंवा शेत! रूपानं तरी चांगला असावा, तर तेहीं नाहीं! गुणावर लक्ष द्यावं तर आंवळ्या येव्हढं पुज. तेव्हां मी या चांडाळाच्या घरीं राहून कोणत्या रीतिनं सुख मानूं ? परका विचार करावा तर आईबापाच्या नांवाला काळोखी लागते. माझ्या

बापाची कीर्ति केव्हढी त्यामुळं हें करणं मला बरं दिसेना. असा विचार करून आजपर्यंत दिवस घालविले. पोरवयांत जरी मला हे समजूं लागलं, तरी आईच्या धाकामुळं माझ्यानं वांकडं पाऊल टाकवलं नाहीं. परंतु आतां मला पूर्ण कंटाळा आला. असं दुःख भोगण्यापेक्षां आपल्या मनाप्रमाणं एखादा जिवलग पाहून त्याजबरोबर आनंद करावा. आईला राग आला तरी चिंता नाहीं. ( इतक्यांत सकुबाई येते. )

सकु—रमा अग रमा. काय करतेस तूं?

रमा—कांहीं नाहीं. सहज बसलें आहें.

स०—तुला जेवायचं नाहीं कां?

र०—मला नाहीं गडे आतां भूक लागली.

स०—अग मघापासून ह्मणत होतीस, आणखी आतां भूक नसायला झालं काय?

र०—माझ्या जिवाला गडे बरं वाटत नाहीं. तूं जेवून घे मी आपली जेवीन केव्हां तरी.

स०—तूं आज अशी कां दिसतेस. तोंड अगदीं उतरलं आहे. आणखी मोठ्या काळजींत मनुष्य असावं अशीं विचारांत अगदीं निमग्नशी दिसतेस.

र०—विचार कशाचा! माझ्या जिवालाकिनी आज बरं वाटत नाहीं. मघापासून इथं बसलें पण करमतच नाहीं कशी हुर हुर वाटते.

स०—असं व्हायाला तुला काय झालं.

र०—तें कांहीं माझ्यानं सांगवत नाहीं.

स०—सांगितलं नाहींतर मी तरी काय समजूं बरं.

र०—( खाली मान घालून उगीच बसते )

स०—बया असं कायबरं करतेस तुलाजर बरं वाटलं नाहीं तर मला गोड लागेल कां? मी तरी काय करूं. तुझ्याकडे पाहून मी सर्व दुःख विसरून गेले. आतां हे तुझे आनंदाचे दिवस. तुह्मी दोघं सुखानं संसार करूं लागलात ह्मणजे माझी काळजी दूर झाली, मी आहे तोपर्यंत तुमची नीट व्यवस्था लावून देईन. आपण नवऱ्याच्या मर्जीनं वागावं, तो जरी नीट नाहीं तरी त्याला वागविण्याचं काम आपलं आहे.

र०—हेंग काय आई तूं मला सांगतेस. मी तुला त्याबद्दल कांहीं ह्मणते कां? उगीच मला त्रास देवूं नकोस.

स०—बाळ अशी कंटाळूं नकोस. मी सर्व समजते पण करूं काय?

र०—तूं या वेळेस माझ्या बरोबर बोलूं नको, मला उगीच बसूं दे, दोन घटका स्वस्थ.

स०—बस बरं मी जाते घटकाभर झोंप घेते. ( निघून जाते ).

र०—काय बरं करावं आईला एका एकी जर कोणती गोष्ट सांगितली तर तिला तें वाईट वाटेल. परंतु मी हट्टच जर घेतला तर ती नाहीं ह्मणणार नाहीं, इतकं मात्र पक्कं मला दिसतं. आतां कायती भिती नवऱ्याची. तर त्यालाही वेळ आल्यास

जबाब देईन कीं, लग्न झाल्या दिवसापासून तूं कांहीं मला खायला किंवा चोळीलुगडं वगैरे कांहींच दिलं नाहींस. त्यांतून घरांत कोणत्याही प्रकारानं सुख लागत नाहीं; तेव्हां तुझ्या घरीं राहून तरी काय उपयोग! बरं, इतका प्रकार करायला आपल्या मनासारखा आधार देणारा तरी कोण आहे? (विचार करून) हो गडे बरी आठवण झाली. ते दिवाणखान्यांत राहणारे कृष्णराव फार चांगल्या स्वभावाचे दिसतात. त्यांची माझी जरी फारशी नजरानजर नाहीं तरी ते संभावित दिसतात. तेव्हां त्यांच्या विषयीं आठ पंधरा दिवस बारीक रीतीनं तपास करावा ह्मणजे बरं. आलाच योगायोग तर फार चांगलं होईल. कारण त्या पुरुषाला मी आज चार दिवसांपासून पाहतें, तर तो महा थोर दिसतो. असो, आतां दैवाचा योगायोग असल्यास ही गोष्ट फारच चांगली होईल. (असें बोलून निघून जाते.)

# प्रवेश ३ रा.

स्थल—कृष्णरावाचा दिवाणखाना.

कृष्णराव, रमा, बळवंतराव, गोपाळपंत.

वगैरे मंडळी व साजिद्यासह नायकीण.

कृष्णाजीपंत—(मनाशीं) अहाहा! उद्योग केल्यापासून मनुष्याला किती सुख आहे! मी आजपर्यंत नोकरी करित नव्हतों तेव्हां सर्व लोक मला नांवें ठेवीत होते; तीच मी हल्लीं नोकरी करूं लागल्यापासून जो तो मला चांगला वागूं लागला ह्मणून ह्मणतात; त्यामुळें माझ्या भावालाहीं बरें वाटूं लागलें. बळवंतराव तर जेव्हां तेव्हां ह्मणतो कीं, असा जर वागशील तर मी फार खुषी होईन, आणि तें खरेंच आहे. उद्योग करून एखादा छंद केल्यास कोणी नांवें ठेवीत नाहींत. फार कशाला, आज मी हट्ट घेतला तेव्हां बळवंतरावानें नायकिणीचें गाणें करण्याचा बेत केला व त्यांत तो फारसा बोलला नाहीं, तेव्हां मनुष्याचें मुख्य कर्तव्यकर्म उद्योग हेंच आहे.(असा विचार करीत बुक वाचीत बसतो. )

र०—कायबाई करावं? यांना पाहिल्या दिवसापासून मला कांहीं चैन पडत नाहीं. घटकाभर दिसले नाहींत तर मला अन्न गोड लागत नाहीं. सारा वेळ

1M821
ता



खिडकींत उभी राहून पहातें. आतां येतील काय? कोणी तशा पोषाखाचा मनुष्य पाहिला ह्मणजे भास होतो. अहाहा! काय एक एक गुण त्यांच्या अंगीं आहेत! रात्रीं जेव्हां कांहीं गात असतात तेव्हां मी घरांत जरी आईच्या धाकानं निजतें तरी झोंप येत नाहीं, सर्व लक्ष तिकडं असतं. त्यांचे स्नेही तरी सर्व कसे त्यांच्या हुकुमांत आहेत! सर्वांत मानमान्यता चांगली आहे; गुणानं, रुपानं कसें योग्य आहेत! देवा, असा जर मला नवरा दिला असतास तर किती चांगलं झालं असतं! परंतु माझं करंटं नशीब ह्मणून या कुपात्राच्या पदरीं पडलें. असो, जें होईल ते होवो कृष्णरावाशीं प्रेम जोडून त्यांच्यासह सुख भोगावं, यापेक्षां कांहीं नको. त्यांनीं जरी मला डागडागिणें दिले नाहींत तरी मी आशा करणार नाहीं, जशी ओली कोरडी भाकरी घालतील तशी खाऊन पायाची सेवा करून राहीन. (इतक्यांत बळवंतराव वगैरे मंडळी येतात.)

**बळ०**—कां कृष्णराव? काय चाललें आहे?

**कृष्ण०**—कांहीं नाहीं, तुमचीच वाट पहात बसलों होतों.

**गोपा०**—बरें बळवंतराव, तुह्मी चंद्राजीला केव्हांची वर्दी दिली!

**बळ०**—दाहा वाजतांची.

**कृष्ण०**—(खिशांतून घड्याळ काढून पाहतो.) आताशें सव्वा नऊ झाले. येईल आतां.

बळ०—कां कृष्णराव तुझ्या मनाप्रमाणें झालें ना ?
कृष्ण०—तुझ्या सारखा मित्र दुनयेंत मिळणार नाहीं.
गोपा०—बरें, आतां उगीच बसून काय उपयोग ! नायकीण येईपर्यंत आपण गंजीफा खेळूं.
बळ०—ठीक आहे, ह्मणजे वेळ तरी जाईल.
गोपा०—कृष्णराव, पेटी कुठें आहे?
कृष्ण०—देतों (जवळच्या पेटींतून पेटी काढून आणून देतो.) अरे पण अद्याप मंडळी कोणी आली नाहींत?
बळ०—येतील आतां. (असें बोलून गंजीफा खेळूं लागतात.)
र०—(बाजूस उभी राहून) कसं बरं करावं? आतां यांचे स्नेही येऊन बसले तेव्हां ही वेळ कांहीं चांगली नाहीं. (विचार करून) मी होऊन जर गोष्ट काढली तर न जाणो राग येईल. कीं काय कोण जाणें बरं दुसऱ्या कोणा जवळून सांगावं तर इतकं आपल्या खात्रीचं आहे कोण? त्यांतून मला इथं येऊन आठ दहा दिवस झाले. तेव्हां शेजा-रीपाजारी लोक तरी बरं म्हणतील कां? आईला ही गोष्ट कळली तर तिला राग येईल. याकरि-तां तसंही करून उपयोग नाहीं. एकदां त्याच्या-शीं बोलणं होऊन त्यांनीं मला संभाळण्याबद्दल कबूल केल्यावर आईला समजून जरी राग आला तर फारशी भीति नाहीं आणि तिला साफ सांग-तां येईल कीं, जर तुला मजजवळ राहणं असलं

तर रहा, नाहीं तर मी पाहिजे तिकडे जाईन. माझ्या जन्माचं मातेरं केलंस आणि आतां मी कृष्णरावाबरोबर राहण्याचं मनांत आणलं तर तूं नको कां म्हणतेस? मला जसं गोड लागेल तसं मी करीन. बहुतकरून तिनं कृष्णरावाला पाहिल्यावर त्यांच्या गुणावरून आई मला हो म्हणेल. (विचार करून) जे होईल तें होवो. आपणच त्यांच्याशीं बोलण्याचा घाट घालावा. उद्यां ते घरीं आल्यावर एकांत संधि पाहून समक्ष विचारावं ह्मणजे झालं. तेही चतुर आहेत. तेव्हांच समजतील. (नायकीण आलीसें पाहून) आतां फार वेळ उभं राहून उपयोग नाहीं. ते इकडेच पहातात तर जाताना त्यांना संकेत करून जावा. (असें बोलून नेत्रसंकेत करून निघून जाते.)

बळ०—(नायकिणीस पाहून) या चंद्राजी. बसा. (तिला बसण्यास जागा दाखवितो.)

गोपाळ०—कां फार उशीरसा लागला चंद्राजी?

चंद्राजी—जी, वस्तादजी यायचे होते ह्मणून.

बळ०—आतां उशीर कां?

चंद्रा०—आमची तयारीच आहे. (असें बोलून तबळा सारंगी वगैरे मिळवून गाण्यास आरंभ होतो.)

## ठुंबरी.

राग ताल त्रिवट.

**मृगनैनी नारमुख चंद्रवदन॥ सुर्याची कांती**

नवीं नटुन नार मारी नेत्रबाण सांवरतीं पदर ॥ धृ० ॥ नेसून शालू भरजरी तार ॥ मग चोळीवरती घेवोनी पदर बुचड्याचा झोंक चाले झरररररर ॥ मृ० ॥ १ ॥

सर्वजन—वाहवा! वाहवा!

चंद्रा०—

## ठुंबरी.

राग पूर्वी, ताल त्रिवट.

काय बजावे बीन लालसे ॥ कलसे लाल गोपाल लाल ॥ धृ० ॥ श्रवण सुनत मोहे खबर न लीनो ॥ डारो प्रेमकी लाल ॥ गोपाल लाल ॥ का० ॥ १ ॥

गोपा०—ठीक ठीक! मजा केली बुवा!

बळ०—चंद्राजी जरा पानबीन खा? (तबक पुढें करतो).

चंद्रा०—(पान खाऊन गाऊं लागते.)

## ठुंबरी.

राग ललत, ताल दादरा.

आजि प्यारे मोहे लिनो वासुरी बजायके॥ वासुरी बजाके मोहे मूरली सुनायके ॥धृ०॥ हर हर हर करत जात, नीर नार भरन जात ॥ नीर नार भरन चली, राखी शरी शरीरके ॥ आ० ॥ १ ॥

कृष्ण०—शाबास चंद्राजी! आतां एखादें प्राकृत होऊं द्या.

चंद्रा०—ठीक आहे.

## लावणी.

चाल तुजवरून काया ओवाळुकीं.

तुजसाठीं किति मी झुरू, झाले पांजरू, धिर हा धरूं, प्रियकर राया ॥ नाहीं सौख्य, सदोदित दुःख मुख्य, हे कैशी विधिची माया ॥ घरिं असुनि पंचपक्वान्न सेवितां भिन्न कदान्न हो वाया ॥ प्रितछंद, तुटेना बंद, वंदिते अक्षय तुमच्या पाया ॥ परनार विषाचे घर, सांगू कुठवर नाहीं तिळभर मजवर, माया ॥ झाले दंग नका करूं भंग रंग हा दो दिवसाचा वाया ॥ धनलोभी असति कसबिणी, करिति जाचणी, जणु वाघिणी पहाती खाया ॥ कुठे अनुसुया, शिवजाया, जगिया, नाहींत ऐशा स्त्रिया ॥ जिव ओवाळीन तुजवरून, बसले मी हरून, दया मनिं धरून यावे हो ठाया ॥ धरी चरण, नको देऊं मरण, अर्पण केली माझी काया॥ स्नेह असो भ्रमरापरी, कमलनीवरी नको परद्वारी जाऊं बसाया ॥

कृष्ण०—वा: फार मजा केली.

गोपा०—घ्या चंद्राजी पान ( तबक पुढें करतो ).

कृष्ण०—( खिशांतून घड्याळ काढून पाहतो ) आतां तीन वाजले.

बळ०—आतां पुरें करा.

कृष्ण०—(पंचवीस रुपये विड्यांत घालून) घ्या चंद्राजी

चंद्रा०—( विडा घेऊन लवून मुजरा करून ) आतां होईल हुकूम.

कृष्ण०—हो हो. जा आतां रात्र बरीच झाली.

चंद्रा०—गरीबावर नजर असावी.

कृष्ण०—हे काय सांगायला पाहिजे(ती निघून जाते).

बळ०—चला आतां आपणही निजूं.

कृष्ण०—आतां सर्वजण इथेच निजा म्हणजे झाले.

बळ०—नको घरीं गेलें पाहिजे.

( सर्व निघून जातात ).

Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit, in memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.


# प्रवेश ४ था.

कृष्णराव, देवजी, नंतर रमा.

कृष्ण०—[मनाशीं] काल हातांत सतार असतां ती रमा नेत्रसंकेत करून हंसत गेली यांतील भावार्थ काय असावा बरें! काय तिच्या मनाला वाटले असेल तें असो. एकंदरींत पात्र उत्तम आहे, परंतु अशा बायका बळेच पुरुषाला नादी लावून फसवितात. तसा तर प्रकार नसेलना? नाहीं तर आताशीं कोठें आपण नीट वागूं लागलों आहोंत तोंच हा प्रकार जर घडला; आणि ही गोष्ट जर बळवंतरावाला समजली तर तो फार दूषण देईल. इतकेंच परंतु तो मजबरोबर बोलणार सुद्धां नाहीं तेव्हां अशा गोष्टीकडे अतःपर लक्ष द्यावयाचें नाहीं नुकतेंच कोठें लोक मला चांगला वागतो म्हणून म्हणूं लागले आहेत. याकरितां अशा गोष्टीकडे लक्ष देणें बरोबर नाहीं व याचा सारासार विचार केल्यावांचून आपण नादीं लागून उपयोग नाहीं. (इतक्यांत रमेचा नवरा देवजी येतो.)

देवजी०—रामराम कृष्णराव.

कृष्णा०—रामराम. या बसा.

देव०—मी तुमच्याकडे कांहीं कामासाठीं आलों आहे.

कृष्णा०—भाझ्याशीं असें काय काम आहे सांगा.

देव०—मला एखादी नोकरी लावून द्याल तर बरें होईल कारण ही शहरची वस्ती आणखी माझ्या मागें दोन तीन माणसांचा खर्च त्यामुळें मी अगदीं कंटाळून गेलो आहे. आपण जर एवढी मेहेरबानी कराल तर फार उपकार होतील. आणि तुमचें नांव होईल.

कृष्णा०—कसली चाकरी कराल तुह्मी.

देव०—जी आपण सांगाल ती, मात्र मजुरीचें काम नको कारण मेहनत माझ्यानें होणार नाहीं.

कृष्णा०—अशी नोकरी मिळण्याला फार प्रयास केले पाहिजेत.

देव०—आपल्या सारख्यांनीं असें ह्मटल्यावर मग काय उपयोग?

कृष्णा०—अहो हल्लीं येथें लिहिणाराला सुद्धां नोकरी मिळण्याची पंचाईत आहे मग तुह्मी तर बिन लिहिणारे आहांत. तशांत कोठें कोणाच्या कारखान्यांत एखादी मोकदमाची जागा झाली तर पाहूं तजवीज. एक दोघांना मी सांगेन खटपट करायला.

देव०—इतकी मेहरबानी झालीच पाहिजे कारण मी फार प्रसंगांत आहे.

कृष्णा०—पूर्वीं तुम्ही काय काम करीत होता?

देव०—मी एका व्यापाऱ्याजवळ होतो तो धंदा मला बरा वाटेना म्हणून ती नोकरी मी सोडून दिली.

कृष्णा०—असा कोणता त्याचा धंदा होता?

देव०--कोळशाचा.

कृष्णा०--हो तर ती नौकरी अगदींच वाईट असते, कारण सदां अंग काळे होतें.

देव०—याकरितांच मी सोडली.

कृष्णा०—बरं तुमच्याकरितां मी प्रयत्न करून पाहीन.

देव०—मजवर फार उपकार होतील.

कृष्णा०—यांत उपकार कसले, मनुष्यांनीं एकमेकांच्या उपयोगी पडावें हा धर्मच आहे.

देव०—जातों तर मी आतां.

कृष्णा०—ठीक आहे. ( देवजी निघून जातो.) मनुष्याला उद्योग नसला म्हणजे फार कठिण स्थिति आहे. त्यांतून ज्याच्या मागें प्रपंच आहे त्याला तर अगदीं कांहीं सुचत नाहीं. मलाच पूर्वीं नोकरी नव्हती तेव्हां कसा वेड्यासारखा झालों. आतांशीं नोकरी करूं लागल्यापासून मात्र मनाला सुख वाटूं लागलें ( इतक्यांत रमा येऊन दाराचे आड बाजूस गालांत हंसत उभी राहते ). परंतु या कामाकाजाच्या त्रासामुळें जीव अगदीं दमून जातो, घटकाभर सुद्धां विश्रांति नाहीं. त्यांत मालक चांगला आहे ह्मणून केव्हां तरी घरीं रहाण्यास सवड सांपडते. खरी विश्रांती म्हणजे रात्रीं मिळते, तर मित्रमंडळी येऊन ऐषआरामांत कांहीं वेळ जातो. तेणेंकरून बरें वाटतें. आतां तसें जर न करावें तर आजपर्यंत आपला वेळ सदां आनंदांत गेलेला तेव्हां मित्रावांचूनही चैन पडत नाहीं. असो, ईश्वर करो आणि

असाच आनंदांत वेळ घालवो ह्मणजे पुरे. ( पुनः सतार वाजवूं लागतो. )

**रमा**—या पुरुषांच्या ठिकाणीं काय मोहनी असेल ती असो पाहिल्यावांचून चैन पडत नाहीं. झोंपेंत जरी असल्यें आणि पायांतील बुटाचा आवाज ऐकला कीं जागी होतें, इतकं माझं मन यांच्याजवळ लागलं आहे. मीच काय परंतु जितके त्यांचे स्नेही येतात त्यांना सुद्धां यांच्यावांचून गोड लागत नाहीं, जो तो यांच्याइथं येऊन बोलत बसत असतो. आणखीं पहातें तों सगळ्यांवर यांचं वर्चस्व आहे. कोणी यांच्यापुढें बोलत नाहीं. अहाहा यांचं प्रेम जर मजवर बसेल तर मी फार सुखाची होईन सदोदित जवळ बसून राहीन आणि मन शांत करीन. देवा येवढं माझं गाऱ्हाणं ऐक. ( विचार करून ) या वेळेस हे एकटेच बसले आहेत पण बोलावं कसं. ( थांबून इकडे तिकडे पाहून ) जें होईल तें होवो माझ्या नशीबानं शेजारींपाजारींसुद्धां घरांत कोणी नाहीं. आणखी आईही घरांत निजली आहे, तर आपण हिय्या करून बोलावंच. ते चतुर आहेत तेव्हांच समजतील. ( दाराआडूनच कृष्णाजीपंतास विचारते ) आतां किती वाजले असतील ?

**कृष्णा०**—( दाराकडे पाहून ) कोण विचारतें तें ?

**रमा**—मी आहें रमा. आतां किती वाजले ?

कृष्ण०—(खिशांतून घड्याळ काढून पाहतो.) दहा वाजले. (पुन्हा सतार वाजवूं लागतो.)

र०—बोलले तर खरें. पण ते सतारीच्या नादांत आहेत. याकरितां आणखी एकदा विचारावें. (पुनः विचारते) तुम्ही जें वाजवितां याला काय म्हणतात,

कृ०—याला सतार ह्मणतात. (सतार बंद करून तिच्याकडे पाहून.) तुम्ही अशा येथें दाराशीं उभ्या राहिलांत हें जर कोणी पाहील तर विनाकारण लोक आम्हाला दोष देतील. याकरितां तुह्मी आपल्या घरांत जा. कारण, आह्माला आहे वरीं धाक, आणि घर आहे जवळ तेव्हां फार जपून वागावें लागतें.

र०—भलत्याच गोष्टीचा धाक पाळला तर चालेल का?

कृ०—सर्व खरें, परंतु आतांचे दिवस फार वाईट आहेत. लोकांच्या मनांत सहज संशय येते. त्यांतून माझ्या नांवाचा बोभाटा असल्याकारणानें भीति पाळावी लागते. बाकी मी कोणालाही भिणारा नव्हे. स्वतःचे जिवावर पाहिजे तें करणारा आहें.

र०—मीही आपल्याप्रमाणंच कोणालाही भिणारी नाहीं.

कृ०—मग चिंता नाहीं. (पुनः सतार वाजवूं लागतो.)

र०—मग सतार वाजवायाला वेळ नाहीं वाटतं?

कृ०—ठीक आहे. (सतार खालीं ठेवून.) कां काय म्हणणें आहे?

र०—बोलूं काय! मला लाज वाटते.

कृ०—ठीक आहे, मी समजलों. परंतु आपला पक्का विचार करा. नाहीं तर अलिकडे असे प्रकार दिसतात कीं, पुरुषांना नादीं लावावें आणि अखेरीस फसवावें.

र०—माझा विचार पक्का आहे. आज दोन चार दिवसांपासून आपल्याला विचारीन ह्मणतें पण धीर होईना. कारण, इकडं राग आला तर बाई काय उपयोग! ह्मणून बोललें नाहीं. माझ्यानं बोलल्यावांचून राहवेना; याकरितां आज धीर केला.

कृ०—ये अशी. ( तिला जवळ घेऊन. ) मी कांहीं नाकबूल नाहीं, परंतु पुढें परिणाम चांगला होत नाहीं, ह्मणून मनाला शंका वाटते.

र०—कांहींएक शंका वाटायला नको. मी आपल्या आज्ञेबाहेर काडीइतकी वागणार नाहीं. आणखी पाहिजे तें झालं तरी आपल्याला अंतर देणार नाहीं. आपल्याकरतां प्राणाची सुद्धां आशा ठेवणार नाहीं. परंतु (गळ्या मिठी मारून) मजवर प्रेम असून आतां जशी जवळ आनंदांत आहें असाच आनंद अक्षयी असो. यापेक्षां मला तुमचे डागडागिने नको, कांहीं नको.

कृ०—रमा, बायका प्रथम अशाच कबुलायती करतात. परंतु अखेरीस त्यांना स्मरण रहात नाहीं.

र०—बोलून काय दाखवूं! पण आपल्याजवळ राहून वागून दाखवीन.

कृ०—ठीक आहे. या तुझ्या प्रेमाकरितां ह्मणून मी या नादांत पुनः पडतों. तर अखेर चांगली कर ह्मणजे झालें. मीही तुला अंतर देणार नाहीं. परंतु माझा स्वभाव आहे तामसी मला कोणाचें बोलणें सहन होत नाहीं. आणि परक्याशीं बोलणें तर मुळींच आवडत नाहीं. नीट रीतीनें वागशील तर तुझ्या तूं नवऱ्याजवळ राहूनसुद्धां तुझामाझा स्नेह चांगला निभेल. कारण, दहा बायकांत तुझें सौभाग्य राहून जातींत राहण्याला हरकत नाहीं.

र०—जसं आपण सांगाल तशी मी वागेन मग तर झालं ना ?

कृ०—बरं पण तुझ्या आईचें मत कसें काय ? नाहीं तर ती करील पंचाईत, ह्मणजे दोघांचीही फजिती.

र०—त्याविषयीं तुह्माला विलकूल काळजी नको. मी सर्व बंदोवस्त करीन.

कृ०—याविषयीं अगदीं वचन. ( हात पुढें करतो. )

र०—हो हो. ( त्याच्या हातावर हात मारते. )

कृ०—ठीक आहे तर. ( घड्याळ पाहून ) आतां दोन वाजायला आले; तर नोकरीवर गेलें पाहिजे असें बोलत बसून उपयोग नाहीं. कोणी पाहीलें तर पंचाईत. आणखी परक्याची ताबेदारीही फार वाईट.

र०—मी तरी तेंच ह्मणतें कीं ही लोकांची भीति जाऊन आपण असे आनंदांत केव्हां सुख भोगूं.

कृ०—ईश्वर करील तर सर्व गोष्टी मनाप्रमाणें होतील.

र०—असा प्रकार करणं आपल्याकडं आहे.

कृ०—पाहतां येईल. जाऊं मी आतां ?

र०—परत येणं केव्हां होईल ?

कृ०—संध्याकाळीं सहा वाजतां.

र०—मला किनई घटकाभरसुद्धां चैन पडत नाहीं काय करूं ? (निरुपायामुळें) आतां तुह्मी जा. पण मी या खिडकींत अगदीं वाट पहात बसेन. रोज तर बसतच होतें, त्यांतून आज—( थांबते )

कृ०—( हंसून ) आज काय झालें ?

र०—( गळ्या मिठी मारून ) मनासारखं.

कृ०—हंः ठीक आहे तर ( एकमेकांचें चुंबन घेतात. कृष्णराव निघून जातो, सखु हें आडून पहाते. )

र०—( त्याकडे पहात स्तब्ध राहते नंतर. ) काय बाई मन तरी आहे. किती थोरपणाचे पोक्त विचार आतां माझी सगळी काळजी दूर झाली. आई जरी रागावली तरी चिंता नाहीं, नवऱ्यालाही सो-डून देईन आणखी राहीन यांच्याजवळ. ( इतक्यां-त रमेची आई येते. )

स०—रमे काय करतेस तूं तिथं ?

र०—कांहीं नाहीं उगीच उभी आहे.

स०—असले भलते नाद माझ्या नाहींहो कामास पडायचे.

र०—( रागावून. ) काय झालंग. कां उगीच त्रास देतेस ?

स०—रागावयला काय झालं! द्वाड कुठली !

र०—( रागानें ) कायग मी केलं ?

स०—घरांत चल.

र०—मी नाहीं येत जा.

स०—( मनाशीं )आतां पोरीला काय करावं! रागावून जर बोलावं तर आपल्यालाच वाईट वाटतं. एकुलती एक पोर आणखी तिचंही धड नाहीं, तेव्हां तिला तरी बोलून काय उपयोग! ( उघड ) असंग काय करतेस! घरांत चल.

र०—घरांत काय आहे! मला गडे करमत नाहीं ह्मणून मी इथं उभी राहिलें.

स०—काम आहे चल.

र०—( रागानें ) चल तर चल. (पाय आपटीत निघून जाते व सखूही जाते. )

## प्रवेश ५ वा.

देवजी, सकु.

देवजी—(रागानें) अरेरे! ही गरिबी किती वाईट आहे! मला कामधंदा नाहीं व जवळ पैसा नाहीं त्यामुळें घरांतला त्रास, आणि तोही आजपर्यंत सहन केला परंतु माझी बायको वाईट चालीची निघाली ह्या गोष्टीचें फार दुःख वाटतें काय करूं बोभाटा करावा तर आपली अब्रु जाते. बरें! उगीच बसावें तर हा प्रकार दिवसेंदिवस ज्यास्तच वाढत जाईल. तेव्हां तसेंही करून उपयोगी नाहीं. (विचार करून.) आतां मामीला हें सांगावें म्हणजे ती बंदोबस्त करील. इतकेंही करून जर ती न ऐकेल तर त्या रांडेची खोड मोडायला काय उशीर. त्या कृष्णरावालाही हात दाखविल्यावांचून राहणार नाहीं. माझ्याशीं गोड गोड बोलतो आणि मनांत काळा पात ना? असो, चिंता नाहीं, (असें बोलून घरांत हांक मारतो) मामी जरा इकडे बाहेर या पाहूं.

स०—कांहो! काय आहे?

दे०—थोडें काम आहे.

स०—बोला काय तें.

दे०—(रागानें) बोलायचें काय! ज्या गोष्टी होतात त्या चांगल्या आहेत ना?

स०—काय झालं काय?

दे०—व्हायचें काय! दुसऱ्याच्या तोंडाला काळोखी.

स०—कोणी लाविली ती?

दे०—तें मला सांगतां येत नाहीं. असें जर होतें तर मजबरोबर लग्न कशाला केलें?

स०—माझ्या रमेचा कांहीं अपराध आहे का?

दे०—लहान सामान्य नव्हे.

स०—तिनं काय केलें तें तर सांगाल?

दे०—सांगूं काय?

स०—ती वाईट काय वागली!

दे०—वागली नव्हे, वागते.

स०—हें बोलणं कांहीं आपल्याला शोभत नाहीं.

दे०—होय. आपल्या मनुष्याचा अपराध दिसत नाहीं.

स०—दाखवून द्या काय केलं तें.

दे०—ठीक, आतां इतकेंच बाकी राहिलें आहे.

स०—अहो, तर ती माझ्याजवळ सदोदित असते. मला कसं समजलं नाहीं. आणि तुम्हालाच कसं समजलं!

दे०—आपल्याला जर खोटें वाटत असेल तर प्रत्यक्ष दाखवीन.

स०—असं कधीं माझ्या पोरीच्या हातून होणार नाहीं उगीच कांहीं निमित्य ठेवणं चांगलं का?

दे०—वहावा एकूण मीच खोटा तर?

स०—तसं नव्हे पण कांहीं तरी विचार करा. भलतंच बोलणं शोभत नाहीं.

दे०—माझें बोलणें शोभत नाहीं आणि वाईट वागणें बरें कां ?

स०—मला पक्कं समजल्यावांचून मी तरी काय बोलू?

दे०—बरें तर प्रत्यक्ष दाखवीन.

स०—मग मी बंदोबस्त करीन. (ती निघून जाते)

दे०—(मनाशीं) दैव फिरलें ह्मणजे सर्व गोष्टी विपरीत होतात. असो. या दोघांचीही खोड मोडली पाहिजे. आतां स्वस्थ बसून उपयोग नाहीं. तर ही जागा सोडून आपण दुसरीकडे रहाण्यास जावें. ( असा रागांत निघून जातो )

Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit. In memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.

## प्रवेश ६ वा.

कृष्णराव, रमा, सकु, देवजी.

कृ०—( मनाशीं ) ईश्वर कृपेनें रमाचा आपला स्नेह झाला, परंतु निभावेलकसा कोण जाणे. कारण बायकांची मनें फार चमत्कारिक असतात. कोणत्या वेळी त्यांची बुद्धी फिरेल याचा नियम नाहीं. आपण तर तिच्या प्रेमाला भुलून तिला वचन दिलें आणि तिनेंही मला फार शपथा घेऊन क्रिया करून दिली, यावरून मीही नादाला लागलों. असो जें होणें असेल तें होईल. एकवार वचन दिलें त्यांत अंतर आणायचें नाहीं. आतां तिच्या आईबद्दल धाक आहे खरा परंतु तिनें त्याचा बंदोबस्त मी करीन ह्मणून सांगितलें आहे. तेव्हां तीही काळजी विशेष नाहीं, झालें नवरा तर तिच्या वचनांच आहे. ( इतक्यांत रमा येते ) ये बैस. ( तिला जवळ घेऊन बसतो )

र०—कां कशाचा विचार चालला होता :

कृ०—कांहीं नाहीं उगीच बसलों होतों.

र०—माझ्या मनाला किनई ( थांबते )

कृ०—( गळ्यांत हात घालून ) काय तुला वाटतें ?

र०—( लाजून खालीं मान घालते )

कृ०—कां बोलत कां नाहींस? सांग काय असेल तें.

र०--( त्याच्या गळां मिठी मारून ) असं सदोदित जवळ असावं.

कृ०--मग तसें होणार नाहीं का? आणि आतां काय कमी आहे. जवळ नाहींस तर काय आहे?

र०--अक्षई जवळ बसण्यासाठीं कोणाचा धाक नको.

कृ०--अग आदब ही फार चांगली यानेंच स्नेह निभतो.

र०—तुमच्या मनाला नाहीं निभणार वाटतं?

कृ०—निभेल परंतु बोभाटा होईल. आणि लोक नांवें ठेवतील

र०—मी कोणाचीही परवा करीत नाहीं, ( गळां मिठी मारून ) या जिवापेक्षां मला कांहीं अधिक वाटत नाहीं.

कृ०—सर्व खरें परंतु मला माझ्या घरचा धाक आहे.

र०—हो बरी आठवण झाली.

कृ०—कशाची.

र०—दुसरं कांहीं नाहीं. तुमचं घरीं कोण कोण आहे

कृ०—आई आहे आणि एक मोठा व एक धाकटा असे दोनभाऊ आहेत.थोरल्या भावाला तीन मुलें आहेत.

र०—तुमचं लग्न झालं किंवा नाहीं?

कृ०—लग्न झालें होतें परंतु दैवानें माझी बायको मरून गेली व दोन मुलेंही मेलीं ( दुःखीत होतो ).

र०—( गळां मिठी मारून ) दैवापुढं कां कोणाचं चालतं, उगीच जिवाला दुःख देण्यांत काय आहे.

कृ०—( डोळ्यांत पाणी आणून ) बायकांवांचून व्यर्थ जीणें आहे.

९४७३२/ना/



र०—(पदरानें डोळे पुसून) मी आहेंना? तुम्ही दुःख कां करितां. तुमच्याकरतां आईचा सुद्धां बंदोबस्त केला. पण तिची आशा ठेवणार नाहीं. नवऱ्याला सोडीन, गणगोत नांवं ठेवतील त्याची लाज सोडीन परंतु (गळा मिठी मारून) या जिवाला कधीं अंतर देणार नाहीं. ज्यास्त काय सांगूं हा जीव तुमच्या पायावर ठेवला आहे मारा अथवा तारा.

कृ०—याच तुझ्या वचनावर भरंवसा ठेवून मी तुझ्याशीं स्नेह केला. तूं जर अशा रीतीनें माझ्याशीं वागशिल तर मीही घरदार आप्तवर्ग इष्टमित्र यांची भीति ठेवणार नाहीं.

र०—आतां मी बोलून काय दाखवूं.

कृ०—ठीक आहे. परंतु तुला एक सांगून ठेवतों, नवऱ्याच्या घरीं असून आपला स्नेह चालला ह्मणजे फार चांगलें होईल. कारण आह्मी पुरुष आहोंत. आमचा बोभाटा झाला आणि आह्मी कांहीं जरी केलें तरी हरकत नाहीं परंतु बायकांची स्थिति फार खराब आहे. त्या नवऱ्याजवळ राहून पाहिजे तें करोत. परंतु एकदां नवरा सोडला ह्मणजे सौभाग्य जाऊन रांड ही पदवी येते. पुढें मग अखंड सौभाग्यवती होते.

र०—आपल्या आज्ञें बाहेर मी वागणार नाहीं, परंतु मला किनई या नवऱ्याचा फार कंटाळा आला आहे.

टिळक ग्रंथसंग्रहालय
दा.क्र. १४७३२

कृ०—असें ह्मणून कोठें चालेल कां ;

र०—काय सांगूं. यानं किनई माझ्या आईला फारहो बुडाविलं, आणि काम नको धंदा नको, दारू पिऊन हिंडायचं मग कसं बरं चालेल. मी तरी काय करावं? आईनं (थांबते).

कृ०—कां आईनें काय केलें?

र०—करायचं काय? जन्माचं मातेरं केलं.

कृ०—यांत तिचा काय दोष तुझें नशीब.

र०—आजपर्यंत वाईट होतं पण आतां चांगलं झालं.

कृ०—कशानं !

र०—आपलं प्रेम जडल्यानं ( इतक्यांत रमेचा नवरा सखुस घेऊन येतो व दोघें बसलीं आहेत असें पाहून )

दे०—मामी पहा पहा, हें. अजूनही मी खोटाचका? ( रमा भिऊन बाजूस उभी राहते )

स०—जरा थांबा असे रागावूं नका.

दे०—फार चांगलं सांगतां.

स०—( रमेस ) रमा कांग इथं आलीस.

र०—( खालीं मान घालून ) मावशीला पत्र लिहिण्याकरितां

दे०—( रागानें ] अग चांडाळणी पत्र लिहिण्याची सबब सांगतेस काय? [ कृष्णरावास ] आणि हा हरामखोर लुच्चा [ असें ह्मणून त्यास मारण्यास धांवतो, सखु त्याला धरते व रमाही त्यास आडवी येते. ]

स०—भलतंच करणं माझ्या कामास पडणार नाहीं.

दे०—कां बरें? कांहीं भीति आहे काय कोणाची?

र०—अहाहा! भारी लग्न झाल्यापासून अन्नवस्त्र देऊन थकलांत किनई!

दे०—(रागानें तिच्या अंगावर धांवून जातो) ज्यास्ती बोलतेस! (सखू त्यास धरते) मामी सोडा हो.

र०—सोडलं तर काय कराल तुम्ही?

दे०—फांशीं गेलों तर बेहेत्तर पण तुझा जीव घेईन.

स०—कांहीं धीर धरा, असं वेड्यासारखं काय करतां?

र०—जीव कांहीं वाटेवर आला नाहीं. आणखी हेंच कां तोंड?

स०—(रमेस) तूं गप बैस बोलूं नको. (देवजीस) तुह्मी जे इतके रागावलांत तर माझ्या पोरीनं काय करावं! किती दुःख भोगावं? तुह्माला हजार वेळां समजून सांगितलं तरी तुमचा दारूचा छंद सुटत नाहीं. उद्योग करायचा नाहीं मग चालेल कसं? आतां तिचे ल्यायचे नेसायचे दिवस, तिला कांहीं नको का? बरं तें असो. पण घरांत खायला तर पाहिजे. ह्या गोष्टींची तुमच्या इथं पंचाईत, मग तिनं तरी काय करावं?

र०—आई मी तुला साफ सांगतें मी कांहीं आतां याच्या वरीं रहाणार नाहीं. जें होणं असेल तें होईल. याचं तरी इतकं बोलणं पाहिजे कशाला?

दे०—ठीक आहे, तूं आज मेलीसच असें समजू-

न मी स्वस्थ राहीन. (रागानें निघून जातो; रमा व सकू कृष्णरावाजवळ येऊन बसतात.)

स०—(तो चिंतातुर बसलेला पाहून) तुह्मी कां असे चिंतावल्यासारखे बसलांत? तो काय करणार आहे?

कृ०—अहो विनाकारण भांडण ह्मणून वाईट वाटतें.

र०—आतां काय वाईट वाटायचं. आतां तर मनासारखं झालं. (सकूच्या कानांत सांगते)

स०—तुमचा माझा बोलण्याचा जरी हा पाहिलाच प्रसंग आहे, तरी तुमची सर्व हकिगत हिनं मला सांगितली. काय करूं मला तरी हें बरं दिसतं का? परंतु ही एकुलती एक पोर, हिचं चांगलं असावं ह्मणून मी माझ्या जिंदगीची यांच्या पायीं धूळधाणी केली कीं दोघांनीं आनंदांत रहावं, आणखी मी पहावं, परंतु त्या मूर्खाला शहाणपणच नाहीं त्याला मी काय करूं, आतां तिच्या मनास आलं तसं तिनं केलं.

कृ०—तें खरें परंतु फार विचार करावा लागतो.

स०—आतां विचार ह्मणून दुसरा करूंच नका. ही कांहीं तुह्माला अंतर देणार नाहीं. मात्र पोरवय असल्यामुळें अपराध केल्यास क्षमा करा आणि हिला अंतर देवूं नका. मी काय दोन दिवसांची सोबतीण. माझ्या मागं हिचं कसं होईल ह्मणून मला मोठी काळजी होती. पण आतां तिनं आप-

ऱ्या मनानं तुह्मांला पसंत केलं तर तुमच्या हातानं मुठभर माती माझ्या अंगावर पडूंद्या, व तिचा शेवट चांगला करा. तुह्मी सुज्ञ आहांत तेव्हां जास्त काय सांगूं!

कृ॰—मी कांहीं नाकबुल नाहीं. परंतु—

स॰—असे विचारांत पडूं नका. हिच्याच रक्ताची शपथ घेऊन सांगतें कीं तुमच्या सांगण्याप्रमाणें मी चालेन. आणखी रमेबद्दल तरी असंच सांगतें कीं प्राण गेला तरी तिला वाईट वागूं देणार नाहीं. हाच माझ्या ह्मातारपणाच्या बोलण्यावर विश्वास ठेवा.

कृ॰—सखुबाई विचार करा. तुह्मी वडील माणसें अहांत ह्मणून तुमच्या शपथेवर विश्वास ठेवून मी ही गोष्ट कबूल करतों, मात्र अखेरीस मान कापूं नका.

स॰—असं भलतंच काय ह्मणतां! वेळ आली तर रमेला अंतर देईन परंतु तुमच्यासाठीं प्राण देईन. हीच माझ्या कुळाची आणि ईश्वराची शपथ आहे.

कृ॰—ठीक आहे. आतां कांहीं काळजी नाहीं.

स॰—मी जाऊं तर आतां घरीं?

र॰—जा तूं निज जा. (सखु निघून जाते, नंतर कृष्णरावाच्या गळ्यास मिठी मारून) ईश्वरानं चांगलं केलं.

कृ॰—पहा बरें रमा, नीट विचार कर.

र॰—मला कांहीं सांगायला नको.

कृ०—बरें आहे तर. ( घड्याळ काढून पहातो )

र०—किती वाजल्या ?

कृ०—एक वाजेल आतां.

र०—अगबाई रात्र बरीच झाली.

कृ०—ही तुझ्याकरितां.

र०—असंच प्रेम मजवर असलं ह्मणजे झालं.

कृ०—आतां नवीन का ठेवायचें ? बरें मला आतां झोंप येते.

र०—मीही तेंच ह्मणतें कीं सकाळीं लौकर उठावं लागतं. तुह्मी निजा मी पाय दाबतें. ( पाय दाबीत बसते पडदा पडतो ).

# प्रवेश ७.

कृष्णराव-रमा.

कृ०—काय चमत्कारिक प्रकार झाला. आतां आपली ही गोष्ट उघडकीस येणार. आणि घरीं समजली ह्मणजे मोठी पंचाईत होईल. त्यांतून बळवंतरावाला समजली ह्मणजे तो तर फार दूषण देईल. तर इथे राहून लोकांचें दूषण घेण्यपोक्षां बाहेर गांवीं कोठें तरी जावें हें उत्तम. आपल्याला ईश्वरानें गुण दिला आहे त्यामुळें कांहीं अडचण पडणार नाहीं. (इतक्यांत रमा येते) ये बैस.

र०—आज तोंड कां अगदीं उतरल्यासारखं दिसतं?

कृ०—तुझ्याबद्दल हकिकत सर्वांना समजली त्यामुळें वाईट वाटतें.

र०—समजली ह्मणून काय झालं. मी कांहीं भीत नाहीं. आणखी तुह्मालाही भिण्याचं कारण नाहीं.

कृ०—भीती ह्मणून इतकीच कीं तुझा नवरा फिर्याद वगैरे करील आणि विनाकारण सरकार दरबारपर्यंत नांवाचा बोभाटा होईल. त्यांतून घरीं दादा रागें भरतील हीच काळजी.

र०—तो काय मेला फिर्याद करतो! आणखी केलीच तर जबाब देण्याला माझी आई आणि मी तयार आहोंत, आपल्यापर्यंत येऊं देणार नाहीं. परंतु मजवरचा लोभ आतां कमी करूं नका.

कृ०—तसें तर होणारच नाहीं, परंतु येथें राहण्यापेक्षां बाहेर गांवीं कोठें तरी जावें असें वाटतें. ह्मणजे काळजी नाहीं.

र०—जसं तुमच्या विचारास येईल तसं करा, मी तर हे पाय सोडणार नाहीं. जिकड तुह्मी तिकड मी येणार.

कृ०—नाहीं ह्मणतो कोण ?

र०—बरं कोणत्या गांवाला जाणार ?

कृ०—नगरास जावें. कारण तेथें उद्योगधंदा चांगला चालेल.

र०—घराहून तुह्माला जाऊं देतील का पण ?

कृ०—मी तूर्त पायानें अजारी आहे हें घरीं सर्वांना माहीत आहे. तर आईला आणि दादांना सांगतों कीं मी चार दिवस हवा बदलण्यासाठीं नगरास जातों ह्मणजे ते कांहीं बोलणार नाहींत. आणखी मी येथून अगोदर गेलों व तूं येथें राहिलीस ह्मणजे लोकांच्या मनांत फार संशयहा येणार नाहीं.

र०—अगबाई ! मग तुह्मी मला केव्हां न्याल ?

कृ०—मी पुढें जाऊन जागेची व माझ्या नोकरीची तजवीज करून आठ दहा दिवसांत तुला घेऊन जाईन.

र०—( खिन्न होते व खालीं पहात स्तब्ध राहते. )

कृ०—( तोंडांवर हात फिरवून हनवटी धरून ) कां ? वाईट वाटलें वाटतें ?

र०--(दुःखानें) आपल्यापुढें मी काय बोलूं ?

कृ०--तूं काळजी करूं नकोस फार दिवस तुला इथें ठेवणार नाहीं. आतांच बरोबर नेली असती, परंतु लोक नांवें ठेवतील व स्टेशनावर पोंचवायला दादा आले ह्मणजे पंचाईत होईल, याकरितां तूर्त नेत नाहीं, तिकडे तरी जुळलें तर बरें, नाहीं तर मी तावडतोब परत येईन. मग येथेंच राहूं, जें होईल तें होवो.

र०--जसं तुमच्या मनास येईल तसं करा. परंतु मला फार दिवस इथं ठेवूं नका. मला किनई आतां तुमच्यावांचून एक घटकाभर सुद्धां चैन पडत नाहीं. तुह्मी नोकरीवर जातां आणि दोनप्रहरीं घरीं लौकर जर आलां नाहींत तर मी खिडकींत वाट पहात बसत असतें आणखी जिवाला हुरहुर वाटते.

कृ०--असो. अर्धी नोकरीवरून रजा मिळाली पाहिजे. तर मी जातों. आतां (घड्याळ पाहून) दोन वाजून गेल्या. आज फार काम आहे.

र०--जाल आतां. बसानात थोडा वेळ.

ना०--नको. उगीच धनी रागें भरेल. त्यांत काय अर्थ आहे !

र०--संध्याकाळीं लौकर घरीं या.

ना०--बरें आहे. (असें बोलून परस्परांचें चुंबन घेऊन जातात.)

# प्रवेश ८.

—○✳○—

### कृष्णराव–रमा–सकु.

कृ०—( मुलीस मांडीवर घेऊन बसला असतां मनाशीं ) काय करावें? आज दीड वर्ष होत आलें, मी नोकरीचा प्रयत्न करतों परंतु कोठें ठिकाण लागत नाहीं. जवळ पैसे होते तेही खर्च झाले. शिवाय दोन चार जिनसाही गहाण ठेविल्या. आतां हा खर्च चालावा कोणत्या रीतीनें ह्याची मला मोठी काळजी पडली, ईश्वरकृपेनें मूल झालें, याच्या अंगावर चार हौसेच्या जिनसा असाव्यात तर घरांत खाण्याचीच पंचाईत, मग त्या व्हाव्यात कशा! देवा, आतां मला सर्व सुख आहे; परंतु पैसा नसल्यामुळें त्या सुखाबद्दल उलट दुप्पट दुःख होत आहे. असो, हेही दिवस जातील. परवां बाळंतपणाकरितां घरींहून शंभर रुपये आणले, ह्मणून बरें झालें. नाहीं तर फार पंचाईत पडली असती. ( इतक्यांत मुलगी रडूं लागते, ह्मणून रमेस हांक मारतो ) रमा, ही तारा रडूं लागली हिला घे.

र०—( जवळ येवून तिला घेऊन ) आज किनई सकाळपासून अशीच रडते, काय करूं! आई केव्हां येते कोण जाणे.

कृ०—मामी कोठें गेल्या?

र०—बाजारांत भाजी आणायला गेली आहे.

कृ०—मग येईल आतां, घटकाभरसुद्धां तुला पोरीला संभाळवत नाहीं? ( रमा हंसूं लागते ) हंसलें म्हणजे झालें.

र०—काय करूं तर ? ( पुनः त्याचे मांडीवर देऊन त्याच्या गळां मिठी मारून) अशी जवळ घेतली तर काय झालं ?

कृ०—मला बाहेर जायचें आहे. तर चल आपण जेवूं.

र०—काय जेव्हा तेव्हां बाहेर जातां ? घटकाभर सुद्धां मजजवळ बसायचं नाहीं. मला गडे नाहीं करमत, हें काय बरें असं आतां काय करायचं आहे बाहेर जाऊन ?

कृ०—घरीं बसून काय करूं उद्योग नकोका बघायला.

र०—लागेल मेला ! जसं व्हायचं असेल तसं होईल.

कृ०—असें बसून कसे चालेल ?

र०—मग काय करणार तर ? इथं आल्यापासून तुह्मी शरिरानं फार खराब झालांत, हाडं दिसायला लागलीं, मला गडे वाईट वाटतं. घरीं होतां तेव्हां खाण्यापिण्याचा बेत चांगला होता.

कृ०—आणि येथें काय कमी आहे ?

र०—नाहीं तर काय ! आमच्या हातचं जेवण ! काय मराठी चालीचं !

कृ०—असें तर खरें.

र०—मला तरी असंच वाटलं, कीं खाणावळींत कोण

काळजी ठेवणार, सगळं परस्वाधीन, ह्मणून मी म्हटलं घरीं जेवलांत म्हणजे बरं.

कृ०—तुझ्या हट्टाकरितां असें करावें लागलें.

र०—लोकांच्या बायका नवऱ्या बरोबर एका ताटांत बसून जेवतांना पाहिल्या ह्मणून मलाही वाटलं, याकरितां मी असं केलं. मला नकोकां तें सुख? त्यांतून आतां दोन दिवसांची बाबद नव्हे रेशमाची गांठ आहे.

कृ०—नाहीं म्हणतो कोण? परंतु घरीं समजलें तर पंचाईत होईल; आणि येथेंही लोक नांवें ठेवतील.

र०—कांहीं नाहीं घरीं सांगतं कोण? आणखी इथं लोक थोडेकां असतील असं करणारे? (असे बोलून दोघेजण उठून एका ताटांत जेवायला बसतांत. आणि परस्परास घास देतांत अशा आनंदांत.)

र०—माझ्या गडे मनांत फार हौस होती, ह्मणून मी हट्ट घेतला.

कृ०—असो झालें ते चांगलेच झालें. (इतक्यांत सकुबाई येतं)

र०—आई कितीग उशीर लावलास.

कृ०—अग पण जावून यायला नकोका?

र०—तारा पहा केव्हां पासून रडते ती.

सकु—आण तिला मी घेते. तूं ही भाजी चिरून घे, आणि स्वैपाककर. कृष्णरावाना भुक लागली अ-

सेल त्यांचं रात्रीं कांहीं जेवण नीट झालं नाही. ( मुलगीस घेतें. )

कृ०—होवूंद्या सावकास. मी आतां जेवलो.

सकु—(कृष्णरावास) चाकरीचं कांहीं जमलंका कुठं ?

कृ०—आद्याप कोठे जुळत नाहीं काय करावें. मी मोठा फिकिरींत पडलो आहे कांहीं उपाय चालत नाहीं.

सकु—तर काय हो ! मनुष्याला उद्योग नसला ह्मणजे गोडलागत नाही आणि खाल्लं आन्न सुद्धां अंगी लागत नाहीं. तुह्मीच जेव्हां मुंबईत उद्योग करित होतां तेव्हां सुख लागून शरिर कसं होतं, तेच इथं आल्यापासून उतरलं.

कृ०—ही काळजी मोठी वाईट आहे. ( उठून ) बरें मी जरा बाहेर जावून येतो.

र०—उगीच कशाला आतां बाहेर जायचं ?

सकु—जावूंदे कांहीं काम असलं तर ? असं बाहेर जायच्या वेळेला माणसाला हटकण लावूंनये.

कृ०—मी लौकरच येतों. ( निघून जातो )

सकु—चल आतां मी तारेला संभाळतें तू स्वैपाक कर लौकर. ( दोघी निघून जातात. )

Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai" by K. V. Pandit. in memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.

# प्रवेश ९.

—⟜✳⟝—

रमा.

र०—(मनाशीं) किती बाई प्रयत्न करतात पण कामाकाजाचं कुठंच जमत नाहीं. जिवाला चैन पडत नाहीं तापयेत आहे. शरिरानं अगदीच खराब झालेत, एखादे वेळीं त्यांच्या घराकडल्या माणसानी पाहिलं तर ह्मणतील, रांडेच्या नादीलागून काय अवस्था झाली. नकोग बाई, अशानं कसं चालेल तिकडचा जिव सुखी आहे तरच आमची हौस, नाहीं तर काय उपयोग ( विचार करून ) आतां घरीं आले ह्मणजे तुप साखर आणायला सांगतें आणखी रोज खायला लाडू करून ठेवतें, ह्मणजे त्यानं कांहीं तरी बरं वाटेल. सकाळी पोरीं करितां जे पावशेर दुध घ्यायचं ते आधोशेर घ्यावं ह्मणजे पावशेर त्याना होईल. जेव्हां सांगावं तेव्हां पैशाची अडचण सांगायची तर मी आतां ऐकणारच नाहीं. मी आपली एक वेळ जेवीन परंतु तुमच्या शरिराला सुख लागण्या करितां लाडू करायचें आहेत असं साफ सांगेन त्याशिवाय कांहीं शरिर सुधरणार नाहीं काय करायचं पैसाला.

( इतक्यांत सकु येते )

सकु—रमा काय करतीसग ?

र॰—कांहीं नाहीं उगीच बसले.

सकु—ताराबापु निजली का ?

र॰—मघांच पाळण्यांत निजविली.

सकु—कृष्णराव कुठे गेले ?

र॰—आतांच गेले बाहेर.

सकु—( जवळ जाऊन बसते. ) अग कृष्णराव उद्योग करित नाहींत, अशानं चालेल कसं !

र॰—तर कायग आई करायचं ?

सकु—हो, आतां मला विचार! तुला सांगितलं नव्हतं कोणची गोष्ट करायची ती विचार पाहून करावी. पण माझं ऐकतो कोण? मला बाई हा त्रास सहन होत नाहीं. किती मेलं दुःख काढावं. आगींतून निघून फुपाट्यांत पडल्याची गत झाली.

र॰—आइ. असंग काय करतेस ? दोन दिवस दुःख पडलं म्हणून काय झालं ? उद्यां एखादी नोकरी लागली ह्मणजे सगळं नीट होईल. मला त्यांच्या शरीराकडे पाहून फार वाईट वाटतं. ते आपल्या घरीं होते तेव्हां कसे आनंदांत होते, आणखी इथं माझ्याकरितां ना त्यांना दुःख ! नाहीं तर इतक्या हाल अपेष्टा करायची काय त्यांनां गरज होती !

स॰—पहा बाई. मी तरी किती सांगूं ! या वयांत दुःखाकष्टानं पैसा मिळवून ह्मातारपणाकरितां ठेवायचा. मग हे दिवस असे गेल्यावर पुढं दुःख भोगायचं, हें मला बरं दिसत नाहीं.

र०–ते तरी काय करतील? घरीं खायला नाहीं ह्याची काळजी करावी कीं नोकरी पहात फिरावं? तरी कधीं घरीं बसत नाहींत. ते जेव्हां तव्हां ह्मणतात, प्रयत्न करतों परंतु नशीब उदयाला येत नाहीं; त्याला मी काय करूं?" बरं, गूण थोडे का आहेत अंगांत? सगळे लोक चांगले ह्मणतात, पण नशीबाला काय करावं? त्यांतून प्रयत्न करतातच. हे दिवस वाईट आहेत, उद्यां निघून जातील.

स०–अग, त्यांचे दिवस जर वाईट आहेत तर आपण आपलं नुकसान कां करून घ्यायचं? असंच नाहीं लावून गोडीनंच सांगावं कीं माझं कां नुकसान करितां? हे दिवस निघून गेल्यावर मला कोणी पैसा देईल कां? तुमच्याजवळूनही नाहीं आणखी बाहेरूनही मिळवूं देत नाहीं, तर हें कांहीं चांगलं नाहीं. इतकं करून जर न ऐकतील तर साफ सांगावं स्नेह तुटला ह्मणून काय हरकत आहे? पैसा असला तर साऱ्या गोष्टी, नाहीं तर कोण विचारतो!!

र०–आई, काय हें भलतंच सांगतेस! असं एकाएकीं कसं बोलवेल? मी त्यांना वचन दिलं आहे. तेव्हां हें कांहीं मला बरं दिसत नाहीं.

स०–त्याला काय झालं! अशीं वचनं किती वेळां देतात आणखी खोटीं करतात. वचन ह्मणजे काय पैसा असला तर, नाहीं तर कोण विचारतो! उद्यां

तुझ्याजवळ पैसा नसूं दे ह्मणजे कसं होईल तें पहा. मी आहें तोंपर्यंत कांहीं हरकत नाहीं. पण माझ्या मागं तुझं चांगलं व्हावं ह्मणून मी सांगतें. करायचं काय यांच्याजवळ राहून?

र०—(रागानें) तुला बोलायला तरी कांहीं वाटतं कां? तूंचना त्यांना शपथ दिलीस? आणखी इतक्यांत फिरलीस! ज्यानीं माझ्याकरितां घरदार सोडलं त्यांना मी असं कधीं सांगणार नाहीं. जसं होणार असेल तसं होईल. त्यांच्या जिवाला सुख तर मला सुख, पैसा असून काय त्याला आग लावायची! ते आहेत तर माझा पैसाच आहे. मला कांहीं नको. तुला वाटेल तसं कर; त्यांना कांहीं मी सोडणार नाहीं माझं कांहीं होवो. तूं आपल्या अकलेनंच त्या मेल्याच्या पदरीं बांधली होतीस तर खरी; एक दिवस देखील मला सुख लागलं नाहीं. तसंच तुझं ऐकून पुढं दुःख भोगायचं कीं नाहीं? त्यापेक्षां कृष्णरावाचा जीव मजवर आहे इतकंच मला पुरे, त्याची बरोबरी कोण करणार! परवां आह्मी धुळ्यास गेलों होतों तर दीड महिन्यांत मला कधीं त्यांनीं इतकंसुद्धां दुःख वाटूं दिलं नाहीं. जी जिन्नस मी मागितली ती मला दिली. घटकाभर मला सोडून कुठं गेले नाहींत. असं त्या पुरुषाचं प्रेम मजवर असून त्याला दगा देऊं? मग ईश्वर माझं चांगलं करील का? खबरदार, आज बोललीस तर बोललीस. पुनः जर असं सांगशील तर माझ्याजवळ तुला मी ठेवणार नाहीं.

( असें बोलून रागानें निघून जाते. )

सकु—काय करावं! ही पोर तर ऐकत नाहीं; आणि दिवस तर निघून चालले. असो, आपण तरी इतक्यांतच कशाला ज्यास्त बोला. हलकेहलके इच्या मनाप्रमाणं वागून हिला वळवली पाहिजे. ( तारा रडते आहे असें ऐकून ) अग बाई! मुलगी उठली वाटतं.

( निघून जाते. )

# प्रवेश १०.

गोविंदराव व रामजीपाटील.

रा०—कां गोविंदराव, कसें काय आहे ? आतांशे तुह्मी कोठें फारसे दिसत नाहीं. काय कामांत गुंतलां आहांत ?

गो०—मी गांवाला गेलों होतों, परवांचे दिवशीं आलों.

रा०—असें काय ? हें नव्हतें मला ठाऊक.

गो०—बरें कांहीं नवी जुनी खबर ?

रा०—हो, बरी आठवण झाली, तुह्माला एक गोष्ट सांगणार आहें.

गो०—कशाबद्दल ?

रा०—जुळलं तर फार मजा आहे.

गो०—सांगाल तर खरें.

रा०—शनवारांत महादेवाच्या देवळाजवळ तो कृष्णराव सोलापूरकर राहातो कीं नाहीं, त्याचें पात्र फार उत्तम आहे. पण काय करावें.

गो०—कां बरें ?

रा०—हा घाट जमतो कसा ?

गो०—अरे हो, तिची आई आहेना पण !

रा०—आहे खरी, परंतु बोलावें कोणी? पाहूं गेलें तर तूर्त कृष्णरावाची दशाच आहे.

गो०—मग हो काय हरकत, तिच्या आईला पैशाची लालुच दाखवावी म्हणजे झालें.

रा०--परंतु तिच्याशीं बोलावं कोणी ?

गो०--ती नको काळजी, त्या राधाबाईची आणि तिची चांगली ओळख आहे; तर तिच्या कडून हें काम करावें.

रा०--पहा बोवा, आपण तर अगदीं तिच्यासाठीं वेडे होऊन गेलों आहोंत, बिलकुल चैन पडत नाहीं.

गो०--तें काम आपलें, तिच्या आईला राधाबाईकडून वळीवलें ह्मणजे झालें कीं नाहीं.

रा०--मग तर काय बोलायला नको.

गो०--मीही फार दिवस तिला पहातों पण काय करावें!

रा०--कां बरें ? काय झालें ?

गो०--अहो दोन तीन वेळां प्रयत्न केला, परंतु तिचें मन कृष्णरावावर असल्याकारणानें आह्माला वाटाण्याचा अक्षता मिळाल्या.

रा०--चिंता नाहीं, एकदां प्रयत्न तर करून पाहूं. पैशाची लालुच फार कठीण आहे.

गो०--असूंद्या हो. शिवरामपंतानें तिला एकहजाराचे दागिने देतों ह्मणून सांगितलें होतें; परंतु तिनें ऐकलें नाहीं.

रा०--असेल ! परंतु आतां कृष्णरावाचे फार हाल आहेत, अशामुळें लौकर वश होईल.

गो०--बरें आहे तर, प्रयत्न करून पाहूं.

रा०--चला तर, आपण राधाबाईच्या घरीं जाऊं.

गो०--चला तर. ( निघून जातात. )

# प्रवेश ११.

## कृष्णराव-रमा-सखु.

कृ०—काय ह्या दैवाची गती चमत्कारिक आहे! इतके प्रयत्न करतों परंतु कोठें चाकरीचा थांग लागत नाहीं; मी किती अभिमानी मनुष्य! कोणाचीं आर्जव करणें मला ठाऊक नाहीं, परंतु हल्लीं माझी अक्कल अगदीं गुंग होऊन गेली. ज्याचें तोंड पहाण्याचा प्रसंग कधीं येणारा नव्हे, त्यांचे पाय धरावे लागतात. रोज उठून पैशासाटीं लोकांचें आर्जव करावें लागतें. माझे वापरण्याचे चांगले कपडे ते सुद्धां गहाण पडले. स्नेहासोबत्यांत तोंड दाखविण्याला जागा नाहीं. बरें, हिला सोडून द्यावी तर तिनें आपल्याला अजून कधींच कोणत्या गोष्टीबद्दल हट्ट घेऊन सांगितलें नाहीं तेव्हां तिचा तरी विश्वासघात काय ह्मणून करावा. माझ्यावर तिचें प्रेम फार आहे, नाहीं तर अशा दुःखांत इतक्या हुकमांत कोण राहणार! आतां तिच्या आईचा स्वभाव फार वाईट आहे; तीच काय करील कोण जाणें. परंतु रमा माझेविषयीं कांहीं मनांत आणणार नाहीं. जिनें माझ्याकरितां दागिन्यांची सुद्धां आशा ठेवली नाहीं; आणि वारंवार माझ्या मनाला धीर देते. (अशा विचारांत असतां रमा येते.) तारा कोठें आहे?

र०—(जवळ बसून.) आईनं घेतली आहे.

कृ०—तूं काय करीत होतीस?

र०—कांहीं नाहीं, घरांतलं काम केलं.

कृ०—माझा जीव तर फार त्रासून गेला.

र०—असं त्रासून काय होतं? (गळां मिठी मारून) मीच मेली पायगुणाची खोटी. माझ्या नशिबीं सुखच नाहीं, सगळ्या गोष्टी मनासारख्या होऊन आतां उद्योगच कां नसावा. असो, तुह्मी गडे मनाला वाईट वाटूं देऊं नका. जसं चालेल तसं खरं. मी तुमच्याजवळ कांहींएक मागत नाहीं. दैवांत असेल तर सर्व मिळेल, पण इकडे जिवाला जो त्रास होतो तो पाहून (डोळ्यांत पाणी आणून) मला फार वाईट वाटतें.

कृ०—(तिला पोटाशीं धरून) वाईट वाटून उपयोग काय! ईश्वर ठेवील तसें राहिलें पाहिजे.

र०—माझ्याकरितां या जिवाची किती हालअपेष्टा होते, याचं मला दुःख होतं.

कृ०—वेडी आहेस. असें करून कसें चालेल! आतां मी एक विचार काढला आहे.

र०—कोणता?

कृ०—चार दिवस बाहेरगांवीं जाऊन नोकरीची तजवीज करून येतों येथें तर आपला उपाय हरला.

र०—बाहेर जाऊन खाण्यापिण्याचे हाल, त्यांतून पैसा जवळ नाहीं; मग काय करणार तुह्मी?

कृ०—कांहीं होवो, परंतु आतां स्वस्थ बसून उपयोग

नाहीं, तूर्त आठ दिवसांची तुमची खाण्याची तज-बीज घरांत आहे. तोंपर्यंत मी जाऊन येतों. जमलें कोठें तर बरेंच झालें.

र०—हो, आमची मात्र काळजी करा. पण आपल्या जिवाला कांहीं सुख नका लागूं देऊं. मी नाहीं जाऊं देणार बाहेर, नाहीं तर मी येतें बरोबर. मला तरी इथं काय करायचं आहे ?

कृ०—मुलगी लहान आहे तेव्हां तुला नेऊन कसें चालेल? तशांतून मी नोकरीकरितां फिरणार आणि तुला कोठें ठेवूं ?

र०—जा गडे माझं कांहींच का ऐकायचं नाहीं ?

कृ०—वेडी आहेस, भलताच काय हट्ट धरतेस. आ, जेवायचें आटोपलें असलें तर पहा, ह्मणजे आतां अकराचेच गाडींतून जातों.

र०—आतांच जायचं ?

कृ०—मग व्यर्थ बसून तरी काय करायचें आहे ?

र०—बोलावं कुणी. (असें ह्मणून घरांत जाते.)

कृ०—प्रथम लोणावळ्यास जावें, कारण तेथें रेलवेचा मोठा कारखाना आहे. त्यांत वर्कशॉपमध्यें पेंटिंगची जागा मिळाल्यास फार चांगलें होईल.

र०—(बाहेर येऊन) चलतांना जेवायला ?

कृ०—चला. (दोघें निघून जातात. पुनः बाहेर येऊन जाण्याची तयारी करतो.)

र०—लौकर परत यागडे. मला आतां करमणार नाहीं.

कृ०—चार पांच दिवसांनीं परत येईन. (असें ह्मणून

रमेच्या तोंडावरून हात फिरवून मुका घेतो, व तारेचा मुका घेऊन ) हिला संभाळ बरं नीट, मारूं बिरूं नकोस

र०—( डोळ्यांत पाणी आणून ) जिवाला चैन नाहीं ह्मणून बाई मला फार वाईट वाटतें.

कृ०—( आलिंगन देऊन धोत्रानें डोळे पुसून ) उगी, रडूं नकोस, आतां मी लौकरच येतों. ( असें बोलून निघून जातो. )

र०—काय बाई, मजकरितां जिवाला त्रास होतो ! ( इतक्यांत सकू येते. )

सकु०—गेले कां कृष्णराव ?

र०—हो आतांच गेले.

सकु०—रमा, तुला किती बरं सांगावं. अग आपला नफा पहायचा तें दिलं सोडून, आणखी उगीच त्याच्या नादाला लागून काय उपयोग.

र०—कायग आई असं सांगतेस. हें चांगलं का ?

सकु—अगबाई तूं आजून लहान आहेस, यांतलं तुला काय समजणार? हे दिवस निघून गेल्यावर मग का तुला पैसा मिळेल? ह्या वयांत तुझे ल्यायचे नेसायचे दिवस तर आंगावर चार चांगले दागिने नाहींत, नेसायला मोठीं लुगडींही नाहींत. बर, खाण्यापिण्याचं तरी सुख कुठं आहे ? अग असं नादाला लागून उपयोगी नाहीं. अशानं तुझा शेवट कसा होईल ?

०—आई नशिबांत असला तर पैसा मिळेल; नाहीं

तर पाहिजे तें जरी केलं तरी काय होणार! कृष्ण-रावाची सर कांहीं दुसऱ्याला येणार नाहीं.

सकु—करायची काय तुमती माया असून ? माझं जर ऐकशील तर फार चांगलं होईल. चार पैसे मिळून दागिने होतील. सगळं नीट होईल, अलिकड तुझ्या नादींही लोक बरेच आहेत. तेव्हां कृष्णरावाला सोडून दे म्हणजे बरं होईल. इतक्या धाकांत राहून कांहीं उपयोगी नाहीं.

र०—त्यांच्या वांचून गडे मला कसं करमेल याची मोठी काळजी आहे.

स०—अहाहा! उद्यां चार माणसं येऊन पैसा मिळूं लागला, ह्मणजे न करमायला काय झालं ?

र०—आईग, त्याणीं मागंच मला पुष्कळ प्रकारच्या गोष्टी सांगितल्या, त्यांत बोलतां बोलतां असं बोलले कीं जर तुझ्या हातून वाईट काम झालं, तर मी तुझा जीव घेईन आणि फांशी जाईन.

सकु—जीव कांहीं वाटेवर पडला नाहीं. करायचं काय अशाचीं मनं संभाळून, राहिले तर राहातील, नाहीं तर जातील.

र०—एकाएकीं असं बोलणं ह्मणजे मोठी पंचाईतच आहे.

स०—असूंदे. मग तुला त्याची युक्ती सांगेन. चल आपण देवाला जाऊं.

र०—चल तर. (असें बोलून निघून जातात.)

# प्रवेश १२.

## रमा–कृष्णराव.

र०—आईनं सांगितलेली युक्ती बरी आहे. पण कृष्णरावाचा स्वभाव फार तापट आहे. ते कसें एकतील कोण जाणें. असो, आतां जसं होईल तसं होवो. आईला सोडून कांहीं उपयोग नाहीं. किती झालं तरी तीच आपल्या काळजीची आहे. कृष्णराव तरी अखेर करणारा मनुष्य आहे; पण काय करील. त्याला पैसा नाहीं, त्यामुळं कसं वेड्यासारखं झालं आहे. देवा कृष्ण रावाला सोडावं असं माझ्या मनांत मुळीच नाहीं पण या आईच्या मर्जी करितां त्या निवलगाला सोडणं आलं. (इतक्यांत कृष्णराव येतो त्यास पाहून उठून दूर उभी राहते.)

कृ०—कां दूरकां उभी राहिलीस?

र०—गेला होतां त्या कामाचं काय झालं?

कृ०—काय करावें कोठें चाकरीचें जमतच नाहीं.

र०—असं जन्मभर तुमचं न जमलं तर मला कां विनाकारण दुःख देतां. मला दागदागिने नकोत कां?

कृ०—नशिबांत असले तर मिळतील. अशी काळजी कां करतेस?

र०—तें कांहीं नाहीं, मी आतां साफ ऐकायची नाहीं. मला वाटेल तसं मी करीन.

कृ०—असें वेड्यासारखें काय भलतेंच बोलतेस !

र०—पाहिजे तें असो, मला पैसा पाहिजे.

कृ०—मजजवळ असून कां मी तुला देत नाहीं ?

र०—( मोठ्यानें ) ह्मणूनच मी बाहेरून मिळवणार ?

कृ०—( तिला जवळ घेण्यास जातो तों ती त्याला झिडकारून धक्का देते. ) अशी वेड्यासारखी भलतेंच काय बोलतेस ? तुला माझा कंटाळा आला वाटतें ?

र०—मला दागिने पाहिजेत. तुमच्या जवळ राहून काय मिळणार हे दिसतंच आहे.

कृ०—( गहिंवरून ) अशी ओरडूं नकोस; लोक ऐकतील तर काय ह्मणतील !

र०—( मोठ्यानें ) मला काय करायचं आहे ? तुह्मी पाळा हवी तर भिती मी साफ ऐकणार नाहीं. ( बाजूस जाऊन उभी राहते. )

कृ०—रमा, असें काय बरं करतेस? तूर्त माझे दिवस वाईट आहेत, जातील निघून. मी तुला सोडून दुसऱ्याला कां पैसा देणार आहें ? ( तिला जवळ घेण्यास जातो. )

र०—( त्यास झिडकारून ) खबरदार माझ्या अंगाला हात लावाल तर! मी कांहीं तुमच्या जवळ रहाणार नाहीं. आणि पुनः तुह्मी मला विचारूं नका.

कृ०—( डोळ्यांत पाणी आणून ) रमा, तुझ्या मी पायां पडतों, परंतु मजवर कृपा कर आणि अशी बोलूं

नकोस. तुझ्या साठीं मी किती बरें प्रयत्न करता ! परंतु काय करूं ?

र०—ही कटकट मला नका सांगूं तुह्मी.

कृ०--(डोळ्यांत पाणी आणून) ठीक आहे; तर मी-च येथून जातों. आतां ज्यापेक्षां तुझें मन इतकें बि-घडलें, त्यापेक्षां येथें रहाणें उपयोगी नाहीं.

र०—मी कांहीं जा ह्मणत नाहीं. तुमच्यावर माझा जीव आहे तो आहेच. तुह्माला पैसा मिळत नाहीं ह्मणून ह्मटलं; यांत तुह्माला वाईट वाटूं नये. मला जर परवानगी दिलीत, तर मी तुह्मांजवळ एक पैसा ही मागणार नाहीं आणखी पाहिजे तर तुह्मांला चैनींत ठेवीन.

कृ०--मेलों तर बेहत्तर! परंतु अशी गोष्ट मला सहन होणार नाहीं; आणखी आतां मला तुझा संबंधही नको. हीच तुझी माझी अखेरची भेट.

र०--असं काय करतां ? मी कांहीं बोभाटा होऊं दे-णार नाहीं. व तुमच्या नांवालाहीं बट्टा लावणार नाहीं.

कृ०—(रागानें) खबरदार पुनः असें बोलशील तर! मी तशा प्रकारचा मनुष्य नाहीं. मला काय क-रायचें आहे ? तुझा माझा आजपासून संबंध सु-टला. तुला वाटेल तें कर.

(असें बोलून निघून जातों.)

र०--काय रागीट स्वभाव असेल तो असो. कांहीं सहन व्हायचं नाहीं. नुसतं घरीं कोणी आलं त-री देखिल मला लोकांच्या दृष्टीस पडूं दिलं ना-

हीं. मग लोकांकडं पाहणं कुठचं ? इतका तर म-
ला धाक होता, आणि आजपर्यंत मीही त्यांच्या
मर्जीप्रमाणं वागलें. हजार रुपयांची थैली त्या ना-
नाशेटानं मजपुढं ठेवली होती, परंतु त्याची सुद्धां
आशा केली नाहीं, आणि ह्मण अहे कीं "अ-
ती तिथं माती " तसं झालं. या आई करितां मी
त्यांना असं निक्षुन बोललें. ( विचार करून )
माझे शब्द ऐकून त्यांच्या मनाची कायग बाई
स्थिती झाली असेल! असो, देवा-जिथं ते राहतील
तिथं त्यांना सुखी ठेव. पैशाकरितां ह्मणून वा-
ईट काम करायचं, नाहींतर मनासारखं सुख कृ-
ष्णरावावांचून मला कुठंच मिळणार नाहीं. हें
मी पक्कं समजतें. ( इतक्यांत घरांतून सकूबाई
हाक मारते ह्मणून रमा निघून जाते. )

# प्रवेश १३.

## कृष्णाजीपंत.

कृष्णाजीपंत—( अंगांत फाटके कपडे घातलेला असा प्रवेश करतो.) अरेरे! काय ही माझी स्थिती! आजपर्यंत माझे चैनींत दिवस गेले. अंगावर कपडे मी मनासारखे वापरले. कधीं मला दुःख माहित नाहीं, परंतु या रांडेच्या नादाला लागल्यापासून अगदीं वेडा होऊन अखेर अंगावर कपडासुद्धां धड नाहीं ना? हा स्त्रीछंद फार कठीण आहे. जो मनुष्य या नादांत पडतो तो सर्फई नाश पावतो. अहाहा! या रांडेनें मला किती माया लावून सर्वस्वी स्वाधीन करून घेऊन अखेर अळवावरल्या पाण्याप्रमाणें प्रेमाचा प्रकार केला, ज्या वेळेस प्रथम माझ्याशीं हिनें स्नेह केला, त्या वेळेस किती क्रिया व शफता केल्या. मी नको ह्मणत असतां त्या म्हातारीनें आणि हिनें नाहीं नाहीं त्याप्रकारें माझी समजूत करून मला वचनांत गोवून घेतलें. त्यामुळें मी आप्तवर्गाच्या विचाराशिवाय वागलों. इष्टमित्रांचा स्नेह तोडून त्यांशीं वांकडा झालों. अब्रूनें खालीं आलों. ब्राह्मणधर्म सोडून मद्यमांस सेवन करूं लागलों. नित्य तिच्या हातचें जेवण आणि तें एका ताटांत; मग काय विचारतां! जातीधर्माकडे लक्ष द्यावें कोणी? परंतु

त्या सौख्याचा ऱ्हास होऊन अखेर तिनेंही हातचें सोडलें. त्यामुळें मध्येंच दोडक्यासारखा लोंबत राहिलों. आतां नाहीं घरदार आणखी नाहीं स्त्री. एकून या स्त्रियांच्या बाह्य स्वरूपावर भुलून जो मनुष्य विचार केल्यावांचून यांच्याशीं स्नेह करतो तो असाच फसणार. ( विचार करून ) अरेरे! मी किती विचारी! किती पापभीरु! किती शहणा! किती लोकमान्य! असा असून अखेर मला जगांत तोंड दाखविण्यास सुद्धां जागा राहिली नाहीं. घरीं जावें तर लोक निंदा करतील, ( विचार करून ) देवा, मी केलेल्या सर्व अपराधांची तुझ्या जवळ क्षमा मागतों, आणि येथून पुढें असल्या छंदाची मला बुद्धि देऊं नकोस. आतां काय बरें करावें ? ( कांहीं वेळ स्तब्ध राहून) काय मी वेडा तर नव्हें ? अशा दुष्ट रांडेकरितां आपल्या जिवाला त्रास काय ह्मणून करून घ्यावा ? आपला जीव सुखी असला तर अशा शेंकडो रांडा मिळतील. धर्म सोडून तिच्या हातचें जेवूं लागलों तर सारांश पहातां जो ह्मणून रांडेच्या नादाला लागला तो बाटल्यावांचून राहिलाच नाहीं. तेव्हां तोही आपल्याला विशेष दोष मानून उपयोगी नाहीं. असो, आतां या देशांत रहाण्यापेक्षां रत्नागिरि मुक्कामी जाऊन कांहीं नोकरी करून रहावें हेंच उत्तम. ( असें बोलून निघून जातो. )

# प्रवेश १४.

## रमा-सकु-रामजी पाटील व गोविंदराव.

र०—(मनाशीं) मनाला हौस असल्यावांचून कोणतीच गोष्ट होत नाहीं. पैशाकरितां मी आईच्या ह्मणण्याप्रमाणं वागूं लागलें. तो गोविंदराव जेव्हां तेव्हां येऊन माझी आर्जव करितो, ह्मणून त्याच्या तोंडापुरतं बोलावं लागतं कीं तुजवर माझं फार प्रेम आहे. परंतु कृष्णरावांच्या नखाची सुद्धां सर येणार नाहीं. गोविंदराव लोकांच्याजवळून पैसे मिळवून देतो, मध्यस्थी करतो ह्मणून त्याच्याशीं गोड बोलायचं, परंतु त्याला त्या गोष्टीची लज्जाच वाटत नाहीं. थोर घराण्यांतील मनुष्याला अशी मध्यस्थी करणं व माझ्याबद्दल दुसऱ्याला पट्टी करून देणं मोठं वाईट आहे. ज्याला अभिमान नाहीं तो पुरुषच नव्हे. माझा कृष्णराव खरा. त्याला कोणाकडं पाहिलेलं देखिल खपत नव्हतं आणि मी एक शब्द बोलतांच इतके दिवस झाले, तरी माझं तोंड पाहिलं नाहीं. मी दोन चार पत्रं पाठविलीं; लोकांबरोबर निरोपही पाठविले, परंतु इथं येणं मला बरं दिसत नाहीं ह्मणून एकदां जबाब आला त्यावर पत्र नाहीं. मीच दुष्ट! आईच्या नादाला लागून त्या जिवलगाला घालिवलं. माझ्या हातचा हिरा जाऊन या मेल्या एक एक गार-

गोष्या पाहून जीव त्रासून जातो. गोविंदराव तर दुसरीं माणसं माझे घरीं आणून बसवितो आणि आपण आपल्या घरीं जातो. यांत त्याला लोक नांव ठेवतील याची लाजच वाटत नाहीं. (इतक्यांत तिला झोंप लागते तों गोविंदराव व रामजी पाटील येऊन आपसांत विचार करतात.)

गो०—अरे, या रांडेला इतके पैसे दिले, तरी आपल्याशीं चांगल्या रीतीनें वागत नाहीं आणि जेव्हां पहावें तेव्हां त्या कृष्णरावाबद्दल मोठी शीफारस सांगत असते.

रा०—याच गोष्टीचा मला फार राग येतो पण काय करावें? इलाज चालत नाहीं.

गो०—काय करावें? माझ्या मनांत फार आहे कीं इला चांगला हात दाखवावा. त्याशिवाय ही ठिकाणीं येणार नाहीं.

रा०—आपल्या तर मनांतून ही अगदीं उतरली. तिच्या घरीं जावेंसें सुद्धां वाटत नाहीं. अरे, माझ्या जवळचे सर्व सोन्याचे दागिने गेले, घर विकलें, बाजारांत लोकांचें देणें झालें, इतकेंही असून मला जेवणाची पंचाईत आली. तर तूं जसें सांगशील तसा मी वागेन, पण हिला चांगली अद्दल घडली पाहिजे.

गो०—मला एक विचार सुचला आहे. परंतु तो फार चमत्कारिक आहे.

रा०—तो कोणता?

गो०—तूं जर साह्य होशील तर हिला सफाई बुडवितों.

रा०—मी अगदीं तुझ्या अर्ध्या वचनांत आहें पण हिची खोड मोडल्यावांचून मला बरें वाटणार नाहीं.

गो०—असें करूं कीं आज आपण इच्यार्शी गोड बोलून हिला आणि हिच्या आईला खूप दारू पाजूं; ह्मणजे त्यांना कधीं सवय नसल्यामुळें बेशुद्ध होतील. मग आपण सर्व दागिने काढून घेऊन निघून जाऊं.

रा०—आणि तिनें फिर्याद केली तर ?

गो०—अरे त्याला कोण भितो ! चार महिने बाहेर गांवीं जाऊन रहावें ह्मणजे झालें. त्यांतून कामदार लोकांची माझी ओळख आहेच. ही लबाड आहे. व आमच्यावर खोटें निमित्य घेते ह्मणून ठरवून आपण मोकळे होऊं.

रा०—हो गड्या, ही युक्ति फार चांगली आहे.

गो०—तूं माझ्या ह्मणण्याप्रमाणें हो ह्मणत जा, ह्मणजें मी पहा तिला आज कसा मोहून टाकतों. ( विचार करून ) बरें तूं जा, आणखी एक दारूची बाटली घेऊन ये.

रा०—ठीक आहे. ( निघून जातो. )

गो०—( रमा जवळ येऊन ) कां रमाजी, आज फारशी झोंप लागली ? ( जागी होत नाहीं हें पाहून तिला उठवून बसवितो ) उठा तर खरें, भलत्याच वेळीं का झोंप घ्यावी ?

र०—( रागानें दूर बसून ) कोण मेला हा त्रास,

घटकाभर मनुष्य पडलं तर देखील कटकट आहेच.

गो०--कां? जिवाला बरें नाहीं वाटतें?

र०--माझं डोकं दुखतं ह्मणून मी निजलें होतें.

गो०--मग आमच्याबरोबर बोलायचें नाहीं कां?

र०—माझ्या जिवाला बरं नाहीं, तुह्मीं कांहीं आतां मजबरोबर बोलूं नका.

गो०--आज तुमच्या जिवाकारितां आह्मी एक विचार केला आहे. आणि तुह्मी जर असें कराल तर कसें होईल?

र०--कसला विचार केला?

गो०--बरेच दिवस झाले, माझ्या मनाला वाटलें कीं दारू प्यावी परंतु तसा योगायोगच येईना, ह्मणून आज बेत केला आहे. आणि रामजीपाटील बाटली आणण्याकारितां गेला आहे.

र०--हाच कां तो विचार? मी साफ सांगतें मी कांहीं घेणार नाहीं.

गो०—हें काय बरें? आमच्याकारितां ही गोष्ट केली पाहिजे.

र०—मी करणार नाहीं. (आईस हांक मारते)आई, हे पाहिलेस कां, उगीच मला भलताच आग्रह करतात.

गो०—त्यांना काय सांगतेस? (सकुबाई येते)

स०—कायग काय आहे?

गो०—हे पहा मला दारू पिण्याचा आग्रह करितात.

स०—कांहो गोविंदराव, तिला जर नसेल घ्यायची तर उगीच कशाला देतां? तुह्मीं आपले घ्या.

गो०—आमच्या मर्जीकरितां थोडी तरीं घेतली पाहिजे आणखी तुह्मींही थोडी घ्या.

स०—भलताच हट्ट कशाला पाहिजे?

गो०—तें कांहीं आपण ऐकणार नाहीं.

स०—रमा, घे त्याच्या मर्जीकरितां थोडी, कोणाचंही मन मोडूं नये. (इतक्यांत रामजी पाटील बाटली घेऊन येतो.

गो०—कांहो मिळाली कां?

रा०—हो, घेऊन आलों.

गो०—आण तर. (बाटली घेऊन त्यांतून एक गलास ओतून सकूस देतो, नंतर रमेस देऊन ते दोघेही पितात. )

र०—आईग, मला किनीं भोंड आल्यासारखं होतें.

स०—गोविंदराव तिला आतां पडूंद्या जरा.

गो०—बरें तर, रमा? तूं निज जरा, ( कांहीं वेळानें सकूसही गुंगी येऊन तीही बेशुद्ध होऊन पडते. )

रा०—गोविंदराव, या दोघी जणी बेशुद्ध होऊन पडल्या. आतां हरकत नाहीं.

गो०—अरे, इतका खटाटोप केला कशाला तर! काढ अंगावरचे दागिनें (असें बोलून सर्व दागिने घेवून) चला आतां कांहीं होवो, अगे चांडाळणी आमचे पैसे घेवून दुसऱ्यावर प्रिती काय? बैस आतां ओरडत. (असे बोलून दोघे निघून जातात. )

र०—( काहीं वेळानें शुद्धीवर येऊन ) आई ! आग आई ( जबाब देत नाहीं. पाहून ) कायग आई इथं गोविंदराव व रामजी पाटील बसले होते, ते नाहींत. ( आंगावर दागिनें नाहींत, असे पाहून ) आगबाई माझ्या अंगावरचे दागीनें कोणी काढले. ( घाबरून सकुस उठविते ) अग ऊठ निजलीस काय माझ्या आंगावरचें दागीनें कुठं आहेत.

सकु०—मलाग काय माहित. ( घाबरी होऊन इकडे तिकडे पाहू लागतें.

र०—आतां कपाळ पहा तुझं, तें मेले लुचें इथं होतें, त्यानींच हे काम केलं त्यांच्या शिवाय कांहीं दागिने गेले नाहींत,

सकु०—मी गेटावर जाऊन शिपायाला घेऊन येते.

र०—जा आतां ओरडायला त्यांचें भोवतीं आधी सांगत होतें, या मेल्यांची संगत नको. हे लूच्चें आहेत केव्हां काय करतील. याचा नेम नाहीं. तूं याना घरांत आणू नको पण ऐकावं कुणी, तुला पैशाची हांव सुटली होती. घे आतां हवा तितका पैसा माझा जिवलग कृष्णराव घालवून दिलास आणखी पैसाहीं बोळवून बसलीस आतां बरं झालं किनई ( विचार करून ) अहाहा कृष्णराव या जगांत आपल्या प्रेमाची बरोबरी करणार कोणी नाहीं. मी महा चंडाळीण, महापातकी. महाकुलटा, अशीं आईच्या नादानं होऊन निष्कलंक आणि गंगाजला प्रमाणं स्वच्छ अशा अंतःकरणास

दुष्ट शब्दानीं दोषीत करून वेऱ्या प्रमाणं इथून घालवून दिलं ( रडूं लागतें ) आतां मला आपलं तोंड केव्हां दृष्टीस पडेल. आपल्या वांचून या जगांत मला कोणीच प्रिय दिसत नाहीं. बायकांची अल्प बुद्धि आज मला खरोखर कळून आली, मी जे आपल्याबरोबर दुष्टाचरण करून सहास केलं त्याचा आतां मला पश्चात्ताप झाला. देवा त्या मूर्तीच्या हातून माझं आहित कधींच झालं नसतं, इतका जरी प्रसंग त्यांच्यावर होता, परंतु त्यानीं कधींच मला दुखीवलं नाहीं. ( विचार करित स्तब्द राहतें. )

सकु०—रमा अशी काय सुस्त बसलीस शिपाई आणून याची चौकशी केली पाहिजे.

र०—( रागानें ) जा तुला हवं तें कर, मला साफ तुझं ऐकायचं नाहीं. मी आपली पोरीला घेऊन कृष्णरावाचा शोध करीत जाणं आणि त्यांना भेटून सर्व अपराधाची क्षमा मागून त्यांचेजवळ राहीन. मला आतां कोणाचीही गरज नाहीं. तुला वाटेल तसं कर. तुझ्या नादानं मी आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला आणि कृष्णरावाची हेळसांड केली. अग ज्या शक्ता, क्रिया कृष्णरावाबरोबर केल्यास त्या तुला सुख लागूं देतील का? ईश्वर कांहीं लांब नाहीं. त्याच्या घरीं न्याय खरा आहे. खोट्याचा परिणाम कधीं चांगला झाला आहे का? आतां जसं केलंस तसं भोग मी आ-

पळी जाणार. ( असें बोलून निघून जाते. )

स०—या पोरीला काय करावं, आतां ही कांहीं ऐकायची नाहीं. तर आपल्याला तरी इथं राहून काय करायचं? तिच्याच बरोबर नारायणरावाकड जावं. तो महा शहाणा आहे. झालेल्या अपराधाची आपणही क्षमा मागावी ह्मणजे झालं. ( निघून जाते. )

# प्रवेश १५.

—∝✻∝—

### कृष्णाजीपंत व नारायणशेट.

कृ०—(मनाशीं) काय करावें? स्त्रीछंद फार खोटा आहे. यांच्या नादांत गुंग होणें ह्मणजे अगदीं वाईट आहे. बरें झालें, मी तिच्या त्रासांतून सुटलों. इथें नारायणशेट यांचा व आपला स्नेह चांगल्या रीतीचा आहे. व त्यानेंही आपल्याला सर्व प्रकारें आनंदांत ठेवलें आहे. तर आतां विनाकारण दुसरीकडे फिरण्यापेक्षां आपण होईल तितक्या मेहेनतीनें त्याच्या व्यापारांत त्याला मदत करावी. तो समजुतदार आहे. आपलें कधीं अहित करणार नाहीं. आपण जर त्याच्याशीं चांगल्या रीतीनें वागलों तर चार लोकांत मानमान्यता होऊन तो सर्व तऱ्हेनें आपली तजवीज चांगली करील. (इतक्यांत नारायणशेट येतो.) या असे इकडे.

ना०—कां? काय विचार चालला आहे?

कृ०—कांहीं नाहीं, कालच्या हुंडीचा जमाखर्च करित बसलों आहें.

नारा०—बरें, अहमदनगराहून कालिदास गुजराकडून परवां पत्र आलें होतें कीं तुमचेकडील बाजारभावाची यादी पाठवा. तर त्याला यादी इतक्यांत पाठवूं नका. कारण, आपले पूर्वींचे बाकीचा निका-

ल झाला ह्मणजे ठीक पडेल. नाहीं तर भावाची फेरबदल झाली असें पाहून विनाकारण सूट मागेल.

कृ०—ठीक आहे.

नारा०—कृष्णराव, माझें तुह्माला इतकेंच सांगणें आहे कीं, तुमचा आणि माझा स्नेह पूर्वींपासून असल्या कारणानें तुह्मी दुःखी किंवा वाईट स्थितींत असलेले माझ्यानें पहावत नाहीं. याकरितां तुह्मी मला सोडून कुठेंच जाऊं नका. मी तुमचें कल्याणच करीन. मलाही पाठबळ कुणाचें नाहीं. परस्परांनीं परस्परांस मदत केल्यामुळें चांगलें होईल. तुह्माला हरएक बाबतींनें सुख लागेल. तशांत अशी तजवीज करीन परंतु मला सर्व बाबतींनें धंद्याच्या बाबीं चांगली मदत कर ह्मणजे मी थोडे दिवसांत काय प्रकार करतों तें पहा.

कृ०—मला तर आतां कशाची आशा नाहीं. तुह्मीं सांगाल तसा मी वागेन. कारण, मी सर्वांची आशा सोडली. फक्त दोन वेळां जेवण आणि कपडालत्ता वगैरे. याशिवाय मला कांहीं नको आणि कोठें जाण्याचीसुद्धां आशा नाहीं. फिरफिरून थकलों, आतां तुह्मी ह्मणालां त्याप्रमाणें धंद्याच्या कामीं मी चांगलीच मेहनत घेऊन व्यवस्था ठेवीन.

ना०—इतकें असल्यावर मी फार खुषी आहें. कारण धंदा वाढविण्याला मनुष्यबळ पाहिजे; नाहीं तर चहूंकडे लक्ष न पुरल्यामुळें नफ्याचा धंदा नुकसानीला कारण होतो.

ना०—त्याविषयीं तुह्मीं काळजी करूं नका. (इतक्यांत रमा येते.)

र०—(बाजूस उभी राहून) आज किती दिवस मी कृष्णरावाचा शोध करतें, परंतु कुठं ठिकाण लागेना. शेवटीं आज एकदांचा पत्ता लागला; पण ते नारायणशेट कुठं राहतात कोण जाणे. आपण आतां बाजारांत जाऊन त्यांच्या दुकानाचा शोध करावा. (असें बोलून पुढें येते व कृष्णरावास पाहून) अहाहा! हे कृष्णराव बसले आहेत. देवा, फार चांगलं झालं, लौकर गांठ पडली. पण आतां मी त्यांना काय बोलूं? ते मजवर रागावून इकड आले तेव्हां माझं बोलणंही मान्य करतात कीं नाहीं कोण जाणे. (विचार करून) असो, एकदम जाऊन आपण त्यांचे पाय धरावे ह्मणजे ते शहाणे आहेत. केवळ माझा धिःकार करणार नाहींत. (त्याच्याजवळ जाऊन त्याचे पाय धरते.)

कृ०—कोण हें? रमा, हें काय करतेस?

र०—माझ्याकडून झालेल्या सर्व अपराधांची क्षमा करावी अशी माझी विनंती आहे. मला आतां सर्वस्वी पश्चात्ताप झाला.

कृ०—असें भलतेंच काय बोलतेस?

र०—खरोखर कृष्णराव, या जगांत तुमच्यासारखा सुस्वभावाचा मनुष्य मिळणं ह्मणजे भाग्याची गोष्ट आहे. मी चांडाळणीनें पुरा विचार न करतां इकडच्या मनाला दुखिवलं याविषयीं मला फार

वाईट वाटतं. तर आतां क्षमा करून मला आपल्या पायांजवळ राहूं द्या.

कृ०—बरें क्षणभर थांब. येथून मी घरीं येतों मग आपण बोलूं.

ना०—कृष्णराव, शरण आलेल्यास मरण देऊं नये. तर आतां तुह्मी तिच्याविषयीं मनांत कांहीं आणूं नका.

कृ०—आपल्या वचनाबाहेर मी नाहीं.

ना०—बरें तर, चला. आपण घरी जाऊन बोलत बसूं.

समाप्त.

Presented to "THE PRIVATE FREE LIBRARY-Dharmapuri, Wai", by K. V. Pandit. In memory of his uncle the late Mr. Bapusaheb Pandit.
टिळक ग्रंथसंग्रहालय
क्र. 14732
891.462